॥ सबका मालिक आत्मा ॥



रक्षाबंधन

निमित्त सर्वांना

हार्दिक शुभेच्छा!

Happy Rakshabandhan

आत्मचिंतनाद्वारे


विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

॥ ॐ गुरुदेव ॥

# आत्मा मालिक

ऑगस्ट-२०२५

॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २४ वे अंक ०८ वा ऑगस्ट २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

विलास गायकवाड,
मो. ९९२२१७४२११

संपादकीय - ध्यान आणि आत्मचिंतन - संत परमानंद महाराज ... ४

दोन संतांचा झगडा व देवस्वरूपाचा उलगडा -डॉ. विजय बाणकर ... ७

ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण-५ - नामदेव सदावर्ते ... १३

अमृत नाथवाणी -बंडोपंत कुलकर्णी ... १८

'ज्ञानेश्वरी'तील आत्मादर्शक सौंदर्यस्थळे - भाग : ६ - डॉ. सुनील शिंदे ... २१

गुरुपौर्णिमा महोत्सव-२०२५ -बी. के. गायकवाड ... २४

आत्मिक चेतना-न्याय और ईमानदारी - नरेश यादव ... २७

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## ध्यान आणि आत्मचिंतन

**संपादकीय**

आजच्या युगात, जिथे तंत्रज्ञान आणि माहितीचा सततचा प्रवाह आपले लक्ष विचलित करतो, तिथे मन शांत ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे. ध्यानामुळे मनाची ही अस्थिरता कमी होते आणि व्यक्तीला स्वतःच्या विचारांचे निरीक्षण करता येते. ध्यानाची प्रक्रिया व्यक्तीला विचार आणि भावनांपासून अलिप्त राहायला शिकवते. ही अलिप्तता हाच आत्मचिंतनाचा पाया आहे, कारण यातूनच व्यक्ती स्वतःच्या खऱ्या स्वरूपाचा शोध घेऊ लागते.

–संत परमानंद महाराज

**ध्या**न आणि आत्मचिंतन यांचा विचार करताना, प्रथम ध्यान या संकल्पनेची व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे. ध्यान ही मनाची एकाग्रता आणि शांततेची अवस्था आहे, जी व्यक्तीला बाह्य जगाच्या गोंधळापासून दूर नेऊन, अंतर्मनाशी जोडते. भारतीय तत्त्वज्ञानात, विशेषतः योगदर्शन आणि बौद्ध तत्त्वज्ञानात, ध्यानाला एक कला आणि विज्ञान असे मानले जाते. पतंजलीच्या योगसूत्रांमध्ये ध्यानाचे 'तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्' असे वर्णन केले आहे, म्हणजेच एखाद्या विषयावर मनाची एकाग्रता सातत्याने टिकवणे म्हणजे ध्यान. ही प्रक्रिया केवळ मनाला शांत करण्यापुरती मर्यादित नाही, तर ती व्यक्तीला स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून देते. दुसरीकडे, आत्मचिंतन म्हणजे स्वतःच्या आत्म्याचा, स्वतःच्या खऱ्या स्वभावाचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे. उपनिषदांमध्ये 'आत्मानं विद्धि'-स्वतःला जाण-असे सांगितले आहे. आत्मचिंतन ही एक खोलवर जाणारी प्रक्रिया आहे, जी व्यक्तीला त्याच्या विचारांचे, भावनांचे आणि कृतींचे मूळ शोधण्यास प्रवृत्त करते. ध्यान आणि आत्मचिंतन यांचा मेळ हा असा आहे की, ध्यान मनाला स्थिर करते, तर आत्मचिंतन त्या स्थिर मनाला स्वतःच्या खोलवर असलेल्या सत्याकडे घेऊन जाते.

मुक्तीचा मार्ग म्हणून ध्यान आणि आत्मचिंतन का महत्त्वाचे आहे, याचा विचार करताना, प्रथम 'मुक्ती' या संकल्पनेचा अर्थ समजून घ्यावा लागेल. भारतीय दर्शनात, मुक्ती म्हणजे बंधनातून मुक्त होणे-म्हणजेच अज्ञान, माया, आणि संसाराच्या चक्रातून सुटका. ही बंधने मनुष्याच्या मनात आणि त्याच्या विश्वाविषयीच्या चुकीच्या समजुतींमध्ये दडलेली असतात. भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की, खरी मुक्ती ही मनाच्या आसक्ती आणि अहंकारापासून मुक्त होण्यात आहे. ध्यान आणि आत्मचिंतन यांच्याद्वारे ही मुक्ती साध्य होते, कारण या प्रक्रियांमुळे व्यक्ती स्वतःच्या मनाच्या खोलवर असलेल्या स्तरांशी संवाद साधते आणि आपल्या खऱ्या स्वरूपाची-आत्म्याची-जाणीव होते. ध्यानाची प्रक्रिया ही व्यक्तीला स्वतःच्या मनाच्या अस्थिरतेची जाणीव करून देते. आजच्या युगात, जिथे तंत्रज्ञान आणि माहितीचा सततचा प्रवाह आपले लक्ष विचलित करतो, तिथे मन शांत ठेवणे हे एक मोठे आव्हान आहे. ध्यानामुळे मनाची ही अस्थिरता कमी होते आणि व्यक्तीला स्वतःच्या विचारांचे निरीक्षण

करता येते. ध्यानाची प्रक्रिया व्यक्तीला विचार आणि भावनांपासून अलिप्त राहायला शिकवते. ही अलिप्तता हाच आत्मचिंतनाचा पाया आहे, कारण यातूनच व्यक्ती स्वतःच्या खऱ्या स्वरूपाचा शोध घेऊ लागते. आत्मचिंतनात, व्यक्ती विचार करते की, 'मी कोण आहे? माझ्या विचारांचे मूळ काय आहे? माझ्या भावनांचे कारण काय आहे?' असे प्रश्न विचारून, व्यक्ती हळूहळू आपल्या अहंकाराच्या पलीकडे जाते आणि स्वतःच्या आत्म्याशी जोडली जाते.

या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, ती व्यक्तीला स्वतःच्या मर्यादित ओळखीपासून मुक्त करते. आपण स्वतःला आपल्या शरीर, मन, आणि सामाजिक भूमिकांशी जोडतो-जसे की, मी एक विद्यार्थी आहे, मी एक कर्मचारी आहे, मी एक पालक आहे. पण आत्मचिंतनातून आपल्याला समजते की, या सर्व ओळखी तात्पुरत्या आहेत. खरा 'मी' हा या सर्वांच्या पलीकडे आहे-तो शुद्ध चेतना आहे, जो अनादी आणि अनंत आहे. ही जाणीवच माणसाला मुक्तीच्या दिशेने घेऊन जाते, कारण ती त्याला मायेच्या बंधनातून मुक्त करते. माया ही एक अशी शक्ती आहे, जी आपल्याला खोट्या गोष्टी खऱ्या वाटायला लावते-जसे की, आपण आपले शरीर, आपली संपत्ती, किंवा आपली सामाजिक प्रतिमा आहोत. ध्यान आणि आत्मचिंतन यामुळे आपण या मायेच्या पडद्याला बाजूला करतो आणि खरे सत्य पाहतो.

या प्रक्रियेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, ती व्यक्तीला त्याच्या भावनांवर नियंत्रण ठेवायला शिकवते. आजच्या काळात, तणाव, चिंता आणि नैराश्य यांसारख्या मानसिक समस्या वाढत आहेत. ध्यानामुळे मन शांत होते आणि आत्मचिंतनामुळे व्यक्तीला त्याच्या भावनांचे मूळ समजते. एखादी व्यक्ती रागावलेली असेल, तर आत्मचिंतनातून ती समजते की, हा राग तिच्या अपेक्षांमुळे किंवा तिच्या अहंकारामुळे निर्माण झाला आहे. ही जाणीव त्या व्यक्तीला रागावर मात करायला मदत करते. अशा प्रकारे, ध्यान आणि आत्मचिंतन यामुळे व्यक्ती केवळ आध्यात्मिक पातळीवरच नव्हे, तर मानसिक आणि भावनिक पातळीवरही मुक्त होते.

ध्यान आणि आत्मचिंतन यांचा सामाजिक परिणामही तितकाच महत्त्वाचा आहे. जेव्हा व्यक्ती स्वतःच्या अंतर्मनाशी जोडली जाते, तेव्हा ती केवळ स्वतःपुरती मर्यादित राहत नाही, तर तिच्या दृष्टीत सर्व विश्व एक आहे, अशी जाणीव होते. ही जाणीव तिला करुणा, प्रेम आणि सहानुभूती यांच्याकडे घेऊन जाते. बौद्ध तत्त्वज्ञानात 'मैत्री ध्यान' ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे व्यक्ती सर्व प्राणिमात्रांप्रति प्रेम आणि करुणा विकसित करते. ही करुणा व्यक्तीला स्वतःच्या अहंकारापासून मुक्त करते आणि तिला इतरांशी जोडते. अशा प्रकारे, ध्यान आणि आत्मचिंतन केवळ वैयक्तिक मुक्तीच नव्हे, तर सामाजिक सौहार्द आणि शांती यांचाही मार्ग आहे.

मुक्तीच्या संदर्भात, ध्यान आणि आत्मचिंतन यांचा मार्ग हा एक सततचा प्रवास आहे. हा प्रवास एका क्षणात पूर्ण होत नाही, तर त्यासाठी सातत्य आणि समर्पण आवश्यक आहे. या प्रक्रियेला 'साधना' असे म्हटले जाते. साधना ही एक अशी प्रक्रिया आहे, जी व्यक्तीला हळूहळू त्याच्या खऱ्या स्वरूपाकडे घेऊन जाते. या प्रवासात, व्यक्तीला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो-जसे की, मनाची अस्थिरता, बाह्य जगाचा गोंधळ, आणि स्वतःच्या अहंकाराचे आव्हान. पण ध्यान आणि आत्मचिंतन

यामुळे ही सर्व आव्हाने पार करता येतात. उदाहरणार्थ, भगवद्गीतेत अर्जुनाला मनाच्या अस्थिरतेबद्दल विचारणा केल्यावर, श्रीकृष्ण सांगतात की, अभ्यास आणि वैराग्य यामुळे मनावर नियंत्रण मिळवता येते. हा अभ्यास म्हणजे ध्यान, आणि वैराग्य म्हणजे आत्मचिंतनातून येणारी अलिप्तता.

या संदर्भात, ध्यान आणि आत्मचिंतन यांचा मार्ग हा केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक व्यक्तींसाठीच नाही, तर प्रत्येकासाठी आहे. आजच्या युगात, जिथे विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन बदलले आहे, तिथे ध्यान आणि आत्मचिंतन यांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. विज्ञानाने आपल्याला बाह्य जग जिंकायला शिकवले, पण अंतर्मन जिंकण्यासाठी ध्यान आणि आत्मचिंतन आवश्यक आहे. आधुनिक विज्ञानानेही ध्यानाचे फायदे मान्य केले आहेत-जसे की, तणाव कमी करणे, एकाग्रता वाढवणे, आणि मानसिक स्वास्थ्य सुधारणे. पण आत्मचिंतन हे या पलीकडे जाते. ते व्यक्तीला त्याच्या जीवनाचा उद्देश शोधायला मदत करते. आजच्या काळात, जिथे लोकांना त्यांच्या जीवनात अर्थ शोधण्याची गरज आहे, तिथे आत्मचिंतन हा एक मार्गदर्शक प्रकाश आहे.

'ध्यान, आत्मचिंतन हाच मुक्तीचा मार्ग आहे' हेच सत्य आहे, जे माणसाला त्याच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून देते. ध्यान मनाला शांत करते, तर आत्मचिंतन त्या शांत मनाला सत्याकडे घेऊन जाते. हा मार्ग साधा नाही, पण तो परिपूर्ण आहे. तो व्यक्तीला केवळ स्वतःच्या बंधनातून मुक्त करत नाही, तर तिला विश्वाशी एकरूप होण्याची संधी देतो. हा मार्ग प्रत्येक व्यक्तीसाठी खुला आहे, आणि त्यासाठी कोणत्याही बाह्य साधनांची गरज नाही-केवळ स्वतःच्या मनाची आणि आत्म्याची तयारी आवश्यक आहे. ध्यान आणि आत्मचिंतन यांच्याद्वारे, व्यक्ती स्वतःच्या अंतर्मनात डुबकी मारते आणि तिथे तिला मुक्तीचा खरा मार्ग सापडतो. म्हणून गुरुदेव आत्मा मालिक माऊलींनी साधकांना आत्मचिंतनाद्वारे ध्यानाचा अर्थात मुक्तीचा मार्ग सांगितला असून, त्या मार्गावर चालून आपल्या जीवनाचा उद्देश सफल करून घ्या.

**||आत्मा मालिक||**

**– संत परमानंद महाराज,**
संपादक

✻✻✻

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## दोन संतांचा झगडा व देवस्वरूपाचा उलगडा

**देवाधिदेवाचे स्वरूप कसे आहे ते 'देव एका पायाने लंगडा' आहे, या अगदी सामान्य भाषेतही श्रीएकनाथांनी सांगितले आहे. प्रकृति व पुरुष हे जणू देवाचे दोन पाय आहेत. प्रकृति व पुरुष यांचा संबंध समजून घेताना देव एका पायाने लंगडा आहे म्हणजे काय ते समजते. विश्वाचे कारण असलेली पंचमहाभूतात्मक प्रकृति ही जड म्हणजे अचेतन आहे. ती सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त असून त्यांच्यामुळे ती गतिमान होत असते म्हणजे हालचाल करीत असते. याउलट शुद्ध जाणीवयुक्त पुरुष म्हणजे आत्मा हा तिच्या त्या हालचालींना केवळ साक्षिभूत असतो.**

- डॉ. विजय बाणकर

**'असा कसा देवांचा देव बाई ठकडा'** अशी सुरुवात असलेल्या भारुडात पुढे लगेचच 'देव एका पायाने लंगडा' आहे, असे म्हणत देवाधिदेवाचे मूळ स्वरूप समजून घेणे हे वाटते तितके व काही विद्वान लोक दावा करतात तितके सोपे नसल्याचे आणि 'घेतो साधुसंतांशी झगडा', असे म्हणत ते प्राप्त करून घेणेदेखील अतिशय अवघड असल्याचे भगवान श्रीकृष्ण यांनी गीतेत म्हटले आहे त्याप्रमाणे संत श्रीएकनाथही सूचित करून गेले आहेत.[१]

अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमधील काही हस्तलिखिते राजस्थान व उत्तरप्रदेशामध्ये सापडली आहेत. अंतिम सद्सत्तेच्या किंवा देवाधिदेवाच्या स्वरूपावरून संत श्रीरोहिदास व संत श्रीकबीर यांच्यामध्ये झालेले वादविवाद त्यांमध्ये नोंदविले गेले आहेत. त्यांपैकी 'कृष्ण श्रेष्ठ की राम श्रेष्ठ' या आशयाचा झगडा लक्षणीय आहे.[२]

त्याचा तपशील असलेल्या या लेखात काही संतवचनांच्या आधारे देवाच्या स्वरूपाचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.

### दोन संतांमधील वाद-प्रतिवाद

श्रीरोहिदास हे कृष्णाचे उपासक होते तर श्रीकबीर हे रामाचे उपासक होते. एक दिवस कबीर रोहिदासांना भेटावयास जातात. त्यांच्याबरोबर दोन विष्णुभक्तही होते. ते रोहिदासांच्या घरी असलेल्या कृष्णमूर्तीला वंदन करतात. कबीर मात्र त्या मूर्तीकडे पाहतात व रोहिदासांजवळ जाऊन बसतात. हे रोहिदासांच्या नजरेस येते.

'श्रीकृष्णाची मूर्ती समोर असताना तिला साधा नमस्कार न करता स्वत:ला वैष्णव म्हणवता, हे कसे', असे ते कबिरांना विचारतात. तेव्हा, 'श्रीरामावाचून आमचे दुसरे दैवत नाही. तुम्ही चामड्याची मूर्ती बनविली, तिच्यात कापूस भरला, तिला आम्ही का नमस्कार करावा', असे कबीर त्यांना म्हणतात. त्यांचे हे उत्तर ऐकून 'चामड्याशिवाय तुम्हाला दुसरे पदार्थ कुठे दिसतात', असे रोहिदास त्यांना म्हणतात.

'तुमचा कृष्ण नंदाच्या घरच्या गाई सांभाळणारा व गौळणींचा आवडता आहे आणि माझा राम राजा दशरथाचा पुत्र, अयोध्येचा सार्वभौम राजा व सर्वांचा आवडता आहे', असे कबीर म्हणतात; तर, 'मायावी

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हरणाच्या मागे धावला, पत्नीला हरवून बसला, नंतर पत्नीवियोगाने रानोमाळ रडत बसला, दगडांना, वृक्षांना कवटाळीत राहिला, असा हा राम तुमचा', असे रोहिदास म्हणतात,

यावर कबीर म्हणतात, 'तुमच्या कृष्णाला आईने उखळीला बांधल्यावर तो रडत राहिला. माझा राम परब्रह्म मूर्ती, सीतेची भक्ती पाहून तिला रानामध्ये शोधीत गेला, जगात सत्कीर्ती होण्यासाठी.' त्यावर रोहिदास हसून म्हणतात, 'राम सार्वभौम म्हणतां तर त्याने वानरसेना कशाला जमविली, रानोमाळ हिंडण्यासाठी? श्रीकृष्ण माझी परब्रह्ममूर्ती. यशोदेची सप्रेम भक्ती पाहून तो बांधून घेत असे, तो कळिकाळावर मात करतो ते आपला अवतार दाखविण्यासाठी. इंद्राने ढग आणले त्यावेळी त्याने करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून धरून सर्वांचे रक्षण केले.' त्यावर कबीर म्हणतात, 'कृष्ण काळालाही भीत नव्हता असे म्हणतां तर काळयवनाला पाहून तो पळत का होता? वानरांच्या हातून महापर्वत आणून रामाने सेतू बांधला. गोवर्धन पर्वत कृष्णाने उचलला, हे कसे?'

श्रीरोहिदास व श्रीकबीर हे दोघेही एकनिष्ठ उपासक होते. रोहिदासांची उपासना कबिरांना पसंत नव्हती. 'रामच श्रेष्ठ, विष घेतल्यामुळे शंकराचे सर्वांग पोळू लागले, रामनाम घेताच त्याला थंड वाटले. वाल्याप्रमाणे जडजीवांचा रामनामाने उद्धार केला आहे', असे ते रोहिदासांना म्हणतात. त्यावर रोहिदास त्यांना म्हणतात, 'राम वनवासाला गेल्यावर दशरथ शोकग्रस्त झाला व मरण पावला. ज्याने पित्याला दुःख दिले तो दुसऱ्यांचे आणखी शेवट काय करणार, कोण जाणे!'

त्यावर कबीर रोहिदासांना विचारतात, 'तुम्ही ज्याची उपासना करतां तो कृष्ण देवकीच्या पोटी जन्माला येईल व कंसाला मारील अशी आकाशवाणी झाली. त्याच्या भीतीने कंसाने वसुदेवदेवकीला बंदिखान्यांत ठेवले. कारागृहांत वसुदेवदेवकीला कधीच सुख मिळाले नाही. जन्मल्यानंतर कृष्ण गोकुळांत पळून गेला. ज्याने पूतनेला मारले म्हणजे स्त्रीहत्या केली त्याची महती तुम्ही कशी काय सांगतां?' यावर, 'रामाने शूर्पणखेला विद्रूप केले, ताटकेचा वध केला, हे तुम्हाला आठवत नाही का, सूर्यवंशात जन्मलेल्या रामाने स्त्रीहत्या केलीच कशी', असे रोहिदास विचारतात तेव्हा कबीर त्यांना म्हणतात, 'तुमचा कृष्ण एक नंबरचा चोरटा होता. गोपिकांच्या घरी जाऊन दूध, दही चोरून खात होता. अवतारी रामाचे वाल्मिकींनी गुण गायले आहेत. तो एकपत्नी होता. तिन्ही जगाचा जो माय तोच माझा राम होय.'

**वाद-प्रतिवादाचा न्यायनिवाडा करण्यासाठी चार देवतांनी केलेला प्रयत्न -**

अशाप्रकारे रोहिदास व कबीर या आपल्या दोन भक्तांचा वाद-प्रतिवाद चालू आहे असे पाहून त्याचा न्यायनिवाडा व त्यांचे सख्य करण्यासाठी वैकुंठनाथ श्रीविष्णू गणपतीला आज्ञा करतो.

गणपती गजवदन, लंबोदर, एकदंत, मूषकवाहनादि रूपात प्रगट होतो व रोहिदासांची बाजू घेऊन म्हणतो, 'कृष्णाची उपासना मला योग्य वाटते.' कबीर नापसंती व्यक्त करीत गणपतीला म्हणतात, 'तुला विचारते कोण? हे रोहिदास व्यभिचारी असल्याने पंचायतनीं तुला पूजतात.[३] लाच खाऊन बोलले म्हणजे न्याय दिला असे होत नाही. तू आल्यावाटेने परत जा.'

नंतर वैकुंठनाथ सूर्याला पाठवतो. ब्राह्मणाच्या वेषात आलेला सूर्य, मला रोहिदासाची उपासना मोठी वाटते, असे म्हणतो. त्यावर कबीर त्याला म्हणतात की माझा राम तुझ्याच वंशात अवतरला तरी तू

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

त्याची भक्ति सोडून गवळ्याची (कृष्णाची) सत्कीर्ती सांगतो आहेस. कबिरांचे हे बोलणे ऐकून सूर्य गप्प राहतो.

नंतर वैकुंठपती देवीला आज्ञा करतो. देवी सिंहावर बसून येते व कृष्णभक्त रोहिदासाने आपले सर्व लक्ष परब्रह्माकडे लावलेले आहे, असे म्हणते तेव्हा 'पशू, बोकडाचा बळी घेणाऱ्या तुला काय म्हणावे? तू परत जा', असे रामभक्त कबीर तिला म्हणतात. तीही गप्प होते.

त्यानंतर वैकुंठपती शिवाला मध्यस्थी करावयास पाठवतो. 'रोहिदासाची भक्ति मला खरी वाटते', असे तोही म्हणतो. कबीर रागावून त्याला म्हणतात, 'शंकरा, तू विरक्त आहेस, स्मशानांत वास करतोस, तुला उपासना, भक्ति हे काय आहे हे कसे कळेल? तू विष घेतले होतेस तेव्हा रामनाम घेऊनच तुला शांत वाटले, हे तुला आठवत नाही असे दिसते. पंचायतन मांडून रोहिदास तुझीही पूजा करतात म्हणून तू त्यांच्या बाजूने बोललास'. कबिरांची ही प्रतिक्रिया ऐकून शंकर म्हणतो की मीपण रामभक्त आहे तरीसुद्धा मी तसे का बरळलो हे काही कळत नाही. शंकर परत जातो.

**वाद-प्रतिवादाचा श्रीविष्णूकृत सूचक निर्णय -**

वैकुंठपतीने पाठविलेले चारही मध्यस्थ राम थोर की कृष्ण थोर हा निवाडा करू शकले नाहीत म्हणून स्वत: वैकुंठपती श्रीविष्णू गरुडावर बसून येतो. आधी हातात धनुष्यबाण घेतलेल्या श्रीरामांचे रूप घेतो. आपल्या आराध्य देवाला पाहून कबीर सद्गदित होतात, त्याला आलिंगन देतात, त्याच्या पायावर लोळण घेतात व आपले मनोरथ पूर्ण होऊन आपण धन्य झाल्याचे व्यक्त करतात. कबीर पाहात असतानाच श्रीविष्णूने धारण केलेले ते श्रीरामरूप पालटते व त्याजागी श्रीकृष्णरूप दिसू लागते. ते पाहून रोहिदास त्याच्या पायीं लागतात व आपल्या आराध्य देवाचे दर्शन झाल्याने आपण धन्य झाल्याचे व्यक्त करतात.

नंतर कबीर व रोहिदास या आपल्या दोन्ही भक्तांना वैकुंठपती श्रीविष्णू हृदयाजवळ धरतो व द्वेषभावना टाकून खेळीमेळीने असावे, असे सांगतो. रोहिदास कबिरांच्या पाया पडतात. कबीर त्यांना उठवून आपल्या हृदयाशी धरतात.

जेवणानंतर जाताना कबिरांच्या बरोबर आलेले भक्त रोहिदासांना सांगतात की एका विष्णूवाचून इतर दैवतांची भक्ति करणे हा व्यभिचार होय. व्यभिचारी भक्ति करू नये. तेव्हा, रोहिदास 'अवश्य' म्हणतात.

**देवाधिदेवाची अनेक रूपे आहेत -**

संत श्रीरोहिदास यांच्या 'अवश्य' या शब्दावरून फक्त विष्णुची एकनिष्ठ भक्ती करणे इष्ट आहे, असे सूचित होते. तथापि, विष्णुरूप हेच देवाधिदेवाचे एकमेव रूप नाही, असेही श्रीरामकृष्ण परमहंसकृत यांनी सोदाहरण समजावून दिले आहे. ते म्हणतात, 'सरडा बहुरूपी असतो, तो नेहमी रंग बदलतो. म्हणून सरडा लाल रंगाचा असतो या म्हणण्याला जशी त्या सरड्याचे अनेक रंग पाहिलेला माणूस मान्यता देतो तशीच मान्यता दुसरा कोणी माणूस जेव्हा सरडा निळ्या रंगाचा असतो असे म्हणतो तेव्हा त्याच्या त्या म्हणण्यालाही मान्यता देतो. सच्चिदानंद भगवंतांचीही अनेक रूपे आहेत. ज्या साधकाने त्यांचे ज्या स्वरूपात दर्शन घेतले असेल तेवढ्याचेच त्याला ज्ञान असणार. परंतु ज्याने प्रभूंची बहुविध रूपे पाहिली

आहेत तो काय म्हणेल बरे? तो हेच म्हणेल, की ही विविध रूपे त्या एकाच प्रभूची आहेत. भगवंत साकार आहेत आणि निराकारही आहेत; याशिवाय आणखी त्यांचे किती प्रकार आहेत, ते कोणीही जाणत नाही.'[४]

विश्वनिर्मितीच्या पूर्वी व आरंभीही असतो त्या देवास 'आद्या' म्हणून संबोधित तो 'आत्मरूप' असल्याचे ज्ञानेश्वरीच्या शुभारंभीं उल्लेखिले आहे. आत्मरूप देवाधिदेव चराचरातील सर्व प्राणीपदार्थांमध्ये भरून उरला आहे. तोच अनंत रूपे धारण करून विश्वांत सर्वत्र नांदत आहे.[५] त्याची दोन विशेष रूपे म्हणजे श्रीराम व श्रीकृष्ण हे त्याचे अवतार होत. अर्थात, श्रीराम व श्रीकृष्ण ही देवाची दोन सगुण रूपे होत. ज्याची आराधना केल्याने साधकाच्या ज्ञानदृष्टीला देवाचे जे रूप अगोदर दिसते तेच त्याला सुखद वाटू लागते. पण त्याच देवाने ब्रह्मदेवापासून सूक्ष्मातिसूक्ष्म जीवजंतूंपर्यंतची सर्व रूपे धारण केली आहेत, असे अनुभवास येते तेव्हा तो रूपातीत, अरूप व गुणातीत वा निर्गुण असल्याचे त्यास सुस्पष्ट होते. अर्थात, देव निर्गुण म्हणजे बहुगुणी वा अनंतगुणयुक्त आहे म्हणजे काय ते त्यास उमगते.[६] अनेक रूपात तोच एक देव असल्याचे पाहतो तो सर्वोत्तम देवाचा धन्य दास असतो, असेही म्हणत श्रीरामदासस्वामी यांनी अप्रत्यक्षपणें देवस्वरूपाचा उलगडा केला आहे.[७]

**देवाधिदेवाचे मूळ स्वरूप -**

खरे तर, स्वतः देवानेच म्हणजे त्याचा आठवा अवतार असलेले भगवान श्रीकृष्ण यांनीच आपले मूळ स्वरूप कसे आहे ते श्रीज्ञानेश्वरांच्या मुखातून सांगितले आहे. ते अर्जुनास म्हणतात,

**'जे महाभूतांचे बीज। जे महातेजाचे तेज।**

**एवं पार्था जें निज -। स्वरूप माझे।।' - ज्ञानेश्वरी, ६.३२३**

यावरून, विश्व ज्या पंचमहाभूतांपासून बनले आहे त्या महाभूतांचे आदिबीज असलेले तटस्थ ब्रह्म हेच देवाधिदेवाचे स्वरूप असल्याचे स्पष्ट होते.

**'करी दह्या दुधाचा रबडा'चा आध्यात्मिक अर्थ -**

लेखारंभी उल्लेखिलेल्या श्रीकृष्णकृत एका बाळलीलेचे वर्णन असलेल्या भारुडांत 'करी दह्या दुधाचा रबडा' असे शब्द संत श्रीएकनाथ यांनी योजिले आहेत. आत्मतत्त्वज्ञानी असलेल्या त्यांचे हे शब्द परम अर्थवाही आहेत. दूध म्हणजे वर उल्लेखिलेले तटस्थ ब्रह्म हे देवाधिदेवाचे रूप होय आणि दही म्हणजे पंचमहाभूतात्मक विश्व होय. दह्याकडेच लक्ष असलेल्यांना ते दही मुळात दूधच होते व आहे, हे दाखवून देण्यासाठीची श्रीकृष्णकृत एक युक्ती म्हणजे त्यांचा रबडा वा बेमालूम एकत्रीकरण करणे होय. अर्थात, विश्व हे मुळात ब्रह्म आहे हे अंतिम सत्य उलगडून घेण्यास ते त्या बाळलीलेतून तत्कालीन भाविकांना प्रवृत्त करीत होते व आता संत श्रीएकनाथही त्या लीलेचे मर्मग्राही शब्दात वर्णन करून आपल्याला प्रवृत्त करीत आहेत. थोडक्यात, पंचभूतांपासून बनलेला देह व त्यात असलेला जीवरूपी देवांश हे अनुक्रमे दही व दूध या शब्दांनी सूचित केले आहेत. देहरूपी दही व ब्रह्मांश असलेले जीवरूपी दूध यांच्या देवकृत रबड्याचे स्वरूप समजून घेतो त्याला देवाच्या स्वरूपाचा उलगडा होत असतो.

तेच काही शब्द असलेल्या भाषेत श्रीज्ञानेश्वरांच्या मुखातूनही त्यांनी आपल्या स्वरूपाचा उलगडा करून दिला आहे. अर्जुनाचे निमित्त करून त्यांनी आपल्यालाही समजावून सांगितले आहे की, ज्याप्रमाणे दूध विरजले असतां तेच स्वभावतः दही होते . त्याप्रमाणे निर्गुण असा जो एकटा मी त्या माझ्यापासूनच

झालेला हा विस्तार म्हणजे हे जग होय. मी तत्त्वत: निर्गुण असून मायोपाधीमुळे (सगुण) साकार होतो. हे सांगण्यामागे माझी एवढीच इच्छा आहे की तुमची दृष्टी माझ्या यथार्थ स्वरूपाला आत्मत्वाने ज्ञानसंपादनार्थ पोहचो म्हणजे माझ्या स्वरूपाचे यथार्थ ऐक्यज्ञान तुम्हाला होवो म्हणजे झाले.[८]

**'देव एका पायाने लंगडा'चा आध्यात्मिक अर्थ -**

देवाधिदेवाचे स्वरूप कसे आहे ते 'देव एका पायाने लंगडा' आहे, या अगदी सामान्य भाषेतही श्रीएकनाथांनी सांगितले आहे. प्रकृति व पुरुष हे जणू देवाचे दोन पाय आहेत. प्रकृति व पुरुष यांचा संबंध समजून घेताना देव एका पायाने लंगडा आहे म्हणजे काय ते समजते. विश्वाचे कारण असलेली पंचमहाभूतात्मक प्रकृति ही जड म्हणजे अचेतन आहे. ती सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त असून त्यांच्यामुळे ती गतिमान होत असते म्हणजे हालचाल करीत असते. याउलट शुद्ध जाणीवयुक्त पुरुष म्हणजे आत्मा हा तिच्या त्या हालचालींना केवळ साक्षिभूत असतो. तो निर्गुण व निष्क्रिय असतो म्हणजे तो अजिबात हालचाल करीत नसतो. या अर्थाने तो सदैव स्थिर म्हणजे लंगडा आहे, असे श्रीएकनाथ यांनी म्हटले आहे.

**'देव एकनाथाचा बछडा'चा परम अर्थ -**

सदर भारुडात शेवटी 'देव एकनाथाचा बछडा' हे परम परमार्थयुक्त शब्दही त्यांनी योजिले आहेत. देवाचे सर्वव्यापक मूळ आत्मरूप हे त्याने अवतार म्हणून धारण केलेल्या मनुष्यरूपाहून खूपच मोठे असते, असे त्यांनी त्यातून सूचित केले आहे. आपल्या मनुष्यरूपाहून आपले आत्मरूप अनंतपट आहे, हे सत्य अवतारी महात्म्यांच्याप्रमाणे देवाधिदेवाशी एकरूप असलेल्या संतमहात्म्यांच्याही अखंडपणे स्मरणात असते.

संत श्रीकबीर हे श्रीरामकृष्णादि अवतार जेथून येतात व जेथे परत जाऊन विसावतात[९] त्या 'ठकडा' म्हणजे सहजासहजी प्राप्त न होणाऱ्या सर्वव्यापक आत्मरूपाशी एकरूप (झाले) होते. म्हणूनच 'मी सदैव असतो व सदैव राहणारही आहे. करोडो विष्णू होऊन गेले, कित्येक करोड कृष्ण, अगणित शंभु तसेच . ज्यांची गणती करणे केवळ अशक्य आहे असे असंख्य देवही होऊन गेल्याचे मी पाहिले; एवढे, हे गोरख, माझे वय आहे', असे आपल्या व पर्यायाने देवाधिदेवाच्या स्वरूपाचा उलगडा करून घेण्यास मार्गदर्शक होणारे विधान त्यांनी करून ठेवले आहे.[१०] जेव्हा पृथ्वी, जल, तेज, वायु गगन ही महाभूतेही नव्हती तेव्हा हरि व हरिचे जन म्हणजे संत होते तसेच सृष्टीचा उत्पत्तिलयपसारा जे आपल्या दिव्यज्ञानदृष्टीने पाहतात तेच संत असतात, असेही त्यांनी म्हटले आहे.[११] संत श्रीएकनाथही देवावतारकार्य करण्यासाठी आलेल्या श्रीकृष्णांचे मूळ स्वरूप व त्यांच्या बाळलीलांचे परम अर्थ जाणत होते. जगाचा खरा नाथ तो एक आत्मदेवच होय. त्या 'एकनाथाशी' एकरूप होते म्हणूनच त्याच्या मानवी बाळमूर्तिला महाकौतुकाने 'देव एकनाथाचा (आपला) बछडा' म्हणत देवाधिदेवाचे व आपलेही स्वरूप (आत्मस्वरूप) त्याच्याहून मोठे असल्याचे त्यांनी उद्घोषिले आहे.

मनुष्यरूपात असतानाही लोकांना आश्चर्यचकित करणाऱ्या विविध लीला करून देव आपल्या सर्वव्यापक स्वरूपाची व आपल्या ठिकाणी असलेल्या अमर्यादित ज्ञानयुक्त सामर्थ्याची कल्पना देत असतो. म्हणूनच उदाहरणार्थ, त्याचा आठवा अवतार असलेले श्रीकृष्णही आपले मनुष्यरूप, योगी-

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

साधकांना ज्ञानदृष्टीने दिसणारे चतुर्भूज रूप व महाकाय विश्वरूप अर्जुनास दाखवून त्या रूपांहून महान असलेल्या आपल्या स्वरूपाच्या तुलनेत आपणच धारण केलेले मानवी बाळरूप हे आपलाही 'बछडा' असल्याचे जणू अगोदरच स्पष्ट करून गेले आहेत.

.

**संदर्भसूची :**

(१) अ) श्रीएकनाथकृत भारुड : असा कसा देवांचा देव बाई ठकडा। देव एका पायाने लंगडा।।१।। शिंकेचि तोडितो मडकेचि फोडितो । करी दह्यादुधाचा रबडा।।२।। वाळवंटीं जातो कीर्तन करितो। घेतो साधुसंतांशी झगडा।।३।। एका जनार्दनीं भिक्षा वाढा बाई। देव एकनाथाचा बछडा।।४।।,

ब) हजारो मनुष्यांत कोणी एखादा माझ्या प्राप्तीसाठी प्रयत्न करतो आणि त्या प्रयत्न करणाऱ्या योग्यांमध्येही एखादाच मत्परायण होऊन माझे खरे स्वरूप जाणतो. - गीता,७.३;

(२) सदर वादविवादाचा बहुतांश तपशील पुढील पुस्तकातून उद्धृत केला आहे : गुरु नानक व संत रोहिदास चरित्र, लेखक - शंकर पांडुरंग गुणाजी, अक्षरविद्या प्रकाशन, पुणे - ४११०३७, (शके १९२३);

(३) शिव, विष्णू, देवी, सूर्य व गणपती या पाच देवतांचे एक आयतन (स्थल) म्हणजे पंचायतन होय.

(४) पृष्ठ क्र. १२१, अमृतवाणी (रामकृष्ण-उपदेश-संग्रह), प्रकाशक - अध्यक्ष, रामकृष्ण मठ, धंतोली, नागपूर - ४४००१२, १२वे पुनर्मुद्रण (२०१२);

(५) श्रीज्ञानदेव अभंग : योगिया दुर्लभ;

(६) समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात, 'परमेश्वराचे अनंत गुण। मनुष्यें काय सांगावी खूण। परंतु अध्यात्मग्रंथश्रवण। होतां उमजे।।' व 'निर्गुण म्हणिजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण। सकळ त्याचे अंश हे प्रमाण। प्रचीत पाहा।।' - दासबोध, अनुक्रमे १८.४.४० व १६.९.४;

(७) मनाचे श्लोक, श्लोक क्र. ४९; (८) ज्ञानेश्वरी, ९.६४-७०;

(९) ज्ञानेश्वरी, ११.६१४; (१०) पृष्ठ क्र. १४९, कबीरविचार, लेखक डॉ. विजय बाणकर, विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे - ४११०३७, (२०२४); (११) श्रीकबीरकृत दोन दोहे : 'धरती गगन पवन नहीं होतां, नहीं तोया नहीं तारा। तब हरि हरि के जन होते, कहै कबीर बिचारा।।' व 'साधुसंत तेहि जना, जिन माना वचन हमार। आदि अंत उत्पत्ति प्रलय, सब देखा दृष्टि पसार।।'

..

**– डॉ. विजय बाणकर,**

बी - ११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,

मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस.),

सिंहगड रोड, पुणे - २४, (९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण-५

जन्माला आलेल्या जीवांना बालपण, तरुणपण व म्हातारपण असते. जीवनानुभवाचे एवढे आयुष्यभर भोग भोगूनही समाधान न झाल्याने काम, क्रोधादि षड्विकारांचे मनावरील प्राबल्य कमी झालेले नसते. शंकराचार्य म्हणतात- अंगं गलितं पलितं मुण्डम् दशनविहीनं जातं तुण्डम. अवयवास ढिलेपणा येते, मान सारखी हलत असते, दात पडून जातात. माणसाप्रमाणे इतर प्राण्यांचेही काम, आशा नष्ट होत नाही.

-नामदेव सदावर्ते

सर्व उपनिषदे या गायी आहेत. त्या गायींचे दूध काढणारा भगवान गोपालकृष्ण असून, अर्जुन हा त्या अमृतमधुर दुधाचे प्राशन करणारा आहे व श्रीमद्भगवद्गीता हे अमृताहून गोड असे दूध आहे. ज्ञानराज म्हणतात-

**तैसे गीतेचे हे दुभतें। वत्स करूनि पार्थातें।**
**दुभिनली जगापुरतें। श्रीकृष्ण गाय।।**

सकाळी गायींना घेऊन रानात जाणारे दिवसभर गवत खाऊन झाल्यावर सायंकाळी त्या गायी ज्याच्या त्याच्या गोठ्यात नेवून सोडणारे गुराखी स्वतः गायींचे दूध पित नाहीत. त्यांना गायीकडून दुधाची अपेक्षा नसते. तरीही साऱ्या गावाच्या गायी ते रानात चरायला नेतात. गायी, गुराखी पाहून ही ओवी आठवते-

**सांडुनि दुधाची टकळी। गोंवारी गांवधेनु वेंटाळी।**
**किंबहुना कर्मफळ। करी तैसे।।**

अत्यंत सहजपणे दुधाची अपेक्षा न ठेवता गोंवारी साऱ्या गावाच्या गायी चारतो. तसे फलाची आशा न बाळगता कर्म करावे. याविषयी ज्ञानराज वरील दृष्टांत देतात. तसेच राजस दानाविषयी सांगताना ज्ञानराज म्हणतात-

**परी मनी धरूनि दुभते। चारिजे जेवीं गाईतें।**
**की पेव करूनि आइतें। पेरू जाईजें।।**

गाय दिसायला खूप छान आहे. पण सायंकाळी दूध काढू देत नाही. लाथा झाडते. अशी काय कोण पोशिल? ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

**आघवांचि विषयी भादी। परि सांजवणी टेंको नेदी।**
**ते खुरतोडी नुसधी। पोषी कवण।।**

अंगात खूप ताप असला तर एऱ्हवी गोड असणारे दूध तापामुळे तोंडाला कडू लागते. ताप असलेल्या माणसाला दूध देऊ नये. ज्ञानराज सांगतात-

**नातरी ज्वरे विटाळले मुख। ते दुधाते म्हणे कडु विख।**
**तेवी अमानुषा मानुख। मानाल माते।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाही म्हणितलें।**
**ऐसेनिही विष होय सुदलें। नवज्वरी देता।।**

दुधात पाणी जास्त आहे यावरून दूधविक्रेत्याशी भांडणारे कोणी पाहिले तर ज्ञानेश्वरीतील ही ओवी आठवते-

**म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी।**
**वांचूनि दुधा मेळऊनि पाणी। फार कीजे।।**

वास्तविक दूध हे पवित्र आणि गोड असते. पण गायीच्या सडावर बसलेल्या गोचिडांना दूध मिळत नाही. ते त्वचेतील रक्त पितात.

**पाहें पां दूध पवित्र आणि गोड। पासीं त्वचेचियां पदराआड।**
**परि ते अव्हेरूनि गोचिड। अशुद्ध काय नेघती।।**

जसे कमळाचे फूल आणि बेडूक एकाच ठिकाणी चिखलात राहतात. पण कमळातील परागकणांचे सेवन दुरून आलेले भ्रमर करतात आणि जवळ राहणाऱ्या बेडकाला चिखलातच रहावे लागते. ज्या

**सिद्धांतासाठी ज्ञानराज हा दृष्टांत देतात, तो असा-**

**तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्वसुखाचा आरामु।**
**की भ्रांतासि कामु। विषयावरी।।**

विषयवासनेच्या भोगातच खरे सुख असे मानून सहज प्राप्त असलेल्या आत्मसुखाकडे दुर्लक्ष करणाऱ्या वृत्तीविषयी ज्ञानराज सांगतात- मृगजळाचे आभासी पाणी पाहून ते पाणी पिऊन तृप्त होऊ असे मानून तोंडात असलेली अमृताची गुळणी बाहेर फेकून देणाऱ्या अभाग्याचे दर्शन घडविल्यानंतर ज्ञानराज सांगतात-

**बहु मृगजळ देखानि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळितां गळाला।**
**तोडिला परिसु बांधिला गळा। शुक्तिकालाभें।।**

दूध पाहताच एक पौराणिक गोष्टीचा उल्लेख असलेली ज्ञानेश्वरीची ओवी आठवते. उपमन्यू हा वशिष्ठकुळातील व्याघ्रपादांचा मुलगा. त्याच्या लहान भावाचे नाव धौम्य. घरची अत्यंत गरिबी असल्याने त्याची आई या दोघांना पाण्यात पीठ कालवून ते दूध म्हणून देत असे. एकदा ती दोन्ही मुले खेळण्यासाठी दुसऱ्याच्या घरी गेली असता त्यांना ताजे दूध देण्यात आले. तोपर्यंत उपमन्यूने खऱ्या दुधाची चव घेतलेली नव्हती. घरी आल्यावर उपमन्यू आईकडे खऱ्या दुधासाठी हट्ट धरून बसला. यावर आई म्हणाली, खरे दूध मिळण्याइतके तुमचे पुण्य नाही. हे ऐकून बाल उपमन्यूने कडक तपाचरण सुरू केले व शंकराला प्रसन्न करून घेतले. शंकरानी त्या उपमन्यू बाळाला दुधाचा समुद्र दिला.

**मागां दूध दे म्हणतलियासाठी। आघवियाचिं क्षीराब्धीची करूनी वाटी।**
**उपमन्यूपुढे धूर्जटी। ठेविली जैसी।।**

सर्पाला पाहून दुधाची आठवण येते. दुष्टाला सर्पाची उपमा देतात. सर्पही दूध दिल्यावर त्याचे विष करतो व दुष्ट लोक त्यावर कोणी उपकार केला तरी उपकारकर्त्यावर प्रहार करतो. ज्ञानराज म्हणतात-

**जो गुण घे दे दोष। अमृताचे करी विष।**
**दूध पाजिलिया देख। व्याळु जैसा।।**

जन्माला आलेल्या जीवांना बालपण, तरुणपण व म्हातारपण असते. जीवनानुभवाचे एवढे आयुष्यभर भोग भोगूनही समाधान न झाल्याने काम, क्रोधादि षड्विकारांचे मनावरील प्राबल्य कमी झालेले नसते.

शंकराचार्य म्हणतात- अंगं गलितं पलितं मुण्डम् दशनविहीनं जातं तुण्डम. अवयवास ढिलेपणा येते, मान सारखी हलत असते, दात पडून जातात. माणसाप्रमाणे इतर प्राण्यांचेही काम, आशा नष्ट होत नाही. म्हातारे गाढव व कुत्रे पाहून ज्ञानेश्वरीची ओवी आठवते. ज्ञानराज एका ओवीत कुत्र्याला ग्रामसिंह म्हणतात-

**खरू टेको नेदी उडे। लातौनि फोडी नाकाडे।**

**तऱ्ही जेवीं न काढे। माघौता खरू।।**

इया ग्रामसिंहाचिया ठायी। जैसा मिळणी ठावो अठावो नाही।

तैसा स्त्रीविषयी काही। विचारीना।।

लहानपणी आईवडिलांवर खूप प्रेम असणारांचे विवाहानंतर कसे माकड होते. साखरेवर माशी बसल्यावर लवकर उठत नाही. ज्ञानदेव म्हणतात-

**चित्त आराधी स्त्रीयेचे। आणि तियेचेनि छंदे नाचे।**

**माकड गारूडियांचे । जैसे होय।।**

मृत्यूसूचक असे अनेक बदल शरीरावर म्हातारपणी दिसतात. ज्ञानराजांनी म्हातारपणाचे खूप गमतीदार वर्णन केले आहे. म्हाताऱ्यांच्या हालअपेष्टा व वेदना पाहून ज्ञानेश्वरीच्या ओव्या आठवतात-

**जैसे बाभुळीचे खोड। गिरबडूनी जाती सरड।**

**तैसे पिचडी तोंड। सरकटिजेल।।**

नाक बिडबिडतात, भुवयां लोंबतात, कान बंद होतात, डोळ्यांनी दिसत नाही. तोंड लाळेने बरबटते, मलमूत्राद्वारे वहतात, छाती कुजते, म्हाताऱ्या झरपड माकडासारखे शरीर होते. अंग लटपट कांपते, हातपाय वाकडे होतात. तोंडातून कफाचा लोंढा येतो. ज्ञानराज म्हणतात-

**वाचेसि अपवाहु। कानी अनुघडु। पिंड गुरुवा माकडु। होईल हा।।**

मरण मागितले तरी येत नाही, नातेवाईक टाळतात, लहान मुले घाबरतात. त्या म्हाताऱ्याची सर्वांकडून अवहेलना होते. बाया नाकं मुरडतात. अनेक नातेवाईक म्हाताऱ्याच्या मरणासाठी नवस करतात. रात्री खोकल्याची ढास लागल्याने शोजाऱ्यांना जागरणे होतील. ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

**उभळीचा उजगरा। सेजारिया सोईलिया घरा।**

**शिणविल म्हणती म्हातारा। बहुतांते हा।।**

असे हे म्हातारपण आपल्याला येईल, याचा विचार करून सज्जन माणसे जागृतपणे जीवन जगतात. ज्ञानराज म्हणतात-

**ऐशी दशा येईल पुढे। तै मन होईल वेडे।**

**तव चिंतूनि ठेवी चोखडें। आत्मज्ञान।।**

बाळकृष्णावर रागावणारी यशोदामाता हे चित्र कुठे दिसले तर ते चित्र पाहताच ज्ञानेश्वरीच्या या दोन ओव्या आठवतात-

**मागा बाळपणी येणे श्रीपती। जै एकवेळ खादली होती माती।**

**तै कोपोनि हाती। यशोदे धरिला।।**

श्रीकृष्णाने माती खाल्ली हे पाहून यशोदामाता खूप रागावली. तेव्हा मी माती खाल्लीच नाही, हे बाळकृष्ण पुन्हा पुन्हा सांगत होता. शेवटी यशोदेने तोंड उघडून दाखविण्यास सांगितले. बाळकृष्णाने आपले तोंड उघडून दाखवताच त्यात यशोदामातेला अंतराळासह चौदा भुवने स्पष्ट दिसली. ज्ञानराज म्हणतात-

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



**मग भेणे भेणे येणे जैसें। मुखी झाडा द्यावयाचेनि मिसें।**
**चवदाही भुवने सावकाशें। दाविली तियें।।**

त्र्यंबकेश्वरी गेल्यावर गोदावरी पृथ्वीवर आणण्यास निमित्त ठरलेल्या गौतमाची गोष्ट आठवून ज्ञानराजांची ही ओवी आठवते-

**मज चैतन्यशंभूचा माथा। जो निक्षेपु होता पार्था।**
**तया गौतमु जालासि आस्था। निधी तूं गा।।**

भगवंत म्हणतात- अर्जुना, पूर्वी शंकराच्या मस्तकावरील जटेत गुप्त असलेली गंगा गोदावरी बाहेर काढण्यास जसा गौतम कारणीभूत ठरला, तसा मी चैतन्यशंभू असलेल्या माझ्या मस्तकी गीतारूपी ठेवा गुप्त होता. तो बाहेर काढण्यास तू श्रद्धानिधी अशा अर्जुना, तू त्यास गौतमी झाला आहेस.

गीतापठणाच्या वेळी गीतेचे महत्त्व सांगणाऱ्या अनेक ओव्या सहज आठवतात. श्रीमद्भगवद्गीता ही लक्ष्मी असे सांगणारी ही ओवी-

**जे ज्ञानामृताची जान्हवीं। जे आनंदचंद्रिंचि सतरावी।**
**विचारक्षीरार्णवींची नवीं। लक्ष्मी जें हें।।**

भगवद्गीतेचे महत्त्व सांगताना भगवंत म्हणतात, गीतेचे तत्वज्ञान म्हणजे ज्ञानामृताची गंगाच आहे. आनंदरूपी चंद्राची ही सतरावी कला आहे. विचारसमुद्रातील ही महालक्ष्मीच आहे.

**जे भगवद्गीता म्हणिजे। जे ब्रह्मेशांनी प्रशंसिजे।**
**जे सनकादिकी सेविजे। आदरेसी।**

श्रीव्यासांच्या महाभारतरुपी कमलपुष्पातील पराग म्हणजे हा गीताग्रंथ. वेदरुपी समुद्राचे मंथन करून श्रीव्यासांनी महाभारतरुपी लोणी काढले. ज्ञानरूप अग्नीने ते चांगले कढविले. तेव्हा त्यातून जे सुगंधी तूप निघाले, तो हा गीताग्रंथ. गीता भगवंताची वाङ्मयमूर्तीच.

**बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदी प्रतिपाद्य देवता।**
**तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथी।।**

पाऊस चालू असताना पाण्याच्या धारा दिसल्यावर ज्ञानेश्वरीतील ही ओवी सहज ओठावर येते-

**रोमा कवण पेरी। सिंधु कवण भरी।**
**पर्जन्याचियां करी। धारा कवण।।**

आकाशात मेघ कोण आणतो? हे आकाश कोणी पांघरले आहे? वारा सतत हिंडत असतो, ही कोणाची आज्ञा? शरीरावर केस कोणी पेरले? समुद्र पाण्याने कोणी भरून ठेवला आहे? पावसाच्या धारा कोण करतो?

अंध व्यक्ती पाहताच काही ओव्या आठवतात. अन्नाच्या एकेका घासासाठी आंधळा भिक्षा मागत फिरत असतो. त्याच्या दुर्दैवाने मार्गात पडलेल्या रत्नाला पायाच्या ठोकरीने दूर लोटतो. ज्ञानराज म्हणतात-

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**ग्रासा एका अन्नासाठी। अंधु धांवताहे किरीटी।**
**आडळला चिंतामणी पाये लोटी। आंधळेपणे।।**

आंधळेपणा म्हणजे अज्ञान. जीवाजवळ ज्ञान नसले तर केलेले कर्म वाया जाते. तसेच एक निदैवी भिकारी भिक्षा मागत फिरत असतो. नेमका धनाचा साठा त्याला दिसणार, नेमके त्याच वेळी त्यास आंधळा माणूस डोळे नसताना कसा चालत असेल, असा विचार करून आपले डोळे झाकून चालू लागला. धनाचा साठा ओलांडून पुढे गेल्यावर डोळे उघडून पुन्हा भीक मागत फिरू लागला. हेच ज्ञानराज एका ओवीत सांगतात-

**कैसे प्राप्तीचिया वेळे। निदैवा आंधळेपणाचे डोहाळे।**
**की असते आपुले डोळे। आपण झांकी।।**

आध्यात्मिक गुरू आज सर्वत्र दिसतात. त्यांचे भक्तांना दिशा देण्याचे कार्यक्रम सर्वत्र सुरू असतात. हे गुरू, बाबा, बुवा, महाराज आपल्या संसारातील दुःखे दूर करतील, या आशेने सामान्य माणसे अविचाराने आपली धनदौलत या आध्यात्मिक गुरूंच्या चरणी वाहतात व दीक्षा घेण्यास योग्य गुरू कोणता, तर ज्याचे दूरदर्शन संचावर सतत कार्यक्रम चालू असतील, तो गुरू म्हणजे सद्‌गुरू मानतात.

**तया गुरूमार्गा टेंके। जयाचा सुगरवा देखे।**
**तरी तयाचा मंत्र शिके। येरू नेघे।।**

ज्या गुरूचा जास्त थाटमाट असतो, त्या गुरूसंप्रदायावर तो विश्वास ठेवतो आणि त्याचाच मंत्र घेतो. दुसऱ्याचा नाही. ज्याच्या वागण्यात ईश्वरनिष्ठा नसते. संतांची कोणतीही लक्षणे नसूनही केवळ थाटमाट पाहून त्या गुरूवर आपला स्वाभिमान, संपत्ती वाहतो. भोग धनमानाच्या आशेने शिष्यांना चतुरपणे फसविणारा सद्‌गुरू मानतात.

**येर बहु जोडती किरीटी। जयांची भजने भोगासाठी।**
**जे आशातिमिरें दृष्टी। मंद जाले।।**

जमिनीत रोवलेला रांजण पाहून ज्ञानेश्वरीतील ओवी आठवते.

**जैसा रोविल्याविणें। रांजणु थारों नेणे।**
**तैसा पडे तै राहणें। एऱ्हवी हिंडे।।**

ज्याप्रमाणे रांजण जमिनीत रोवल्याशिवाय स्थिर राहत नाही, तसा अज्ञानी पुरुष जमिनीवर पडला तरच एके ठिकाणी राहिल, अन्यथा सर्वत्र हिंडत राहतो. चंचलपणा इतका की, जणू माकडाचे भावंडच. ज्याच्या मनाला बंधन नसते, जो व्रतांना मोडतो, स्वधर्माला लाथेने झुगारतो. ज्याला पापांचा कंटाळा नाही. अस्थिर मनाचा हा माणूस स्वैरपणे भटकत राहतो. ज्याचे चित्त स्थिर नाही, तो खरा अज्ञानी. ज्ञानदेव म्हणतात-

**तयाच्या ठायी उदंड। अज्ञान असे वितंड।**
**जो चांचल्ये भावंड। मर्कटाचे।।**

विविध प्रसंगी ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण करून देणाऱ्या ज्ञानराजांना वंदन!

**- नामदेव सदावर्ते,**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## अमृत नाथवाणी

**नाथ संप्रदाय हे अध्यात्म, योगमार्ग आणि वैराग्य यांचं प्रतीक आहे. त्यांच्या भाष्यांमध्ये 'अनुभव' हे खूप महत्त्वाचं स्थान घेतं. 'ज्ञानमनुपम' अशा स्वरूपाचं ज्ञान फार दुर्लभ आणि उदाहरणाच्या पलीकडचं आहे. तो अनुभव घेतल्याशिवाय याची खरी जाणीव होत नाही. हे ज्ञान पुस्तकांमध्ये नव्हे तर आत्मप्रत्ययामध्ये मिळतं. त्यामुळे ते अद्वितीय आहे. व्यक्तीकेंद्रित, पण सर्वसमावेशक देखील आहे. या वचनातून नाथ हे आपल्याला त्याग, समर्पण, आणि आत्मस्थिती यासंबंधी जीवनाचं अत्यंत मूलभूत तत्त्वज्ञान शिकवत आहेत.**

**-बंडोपंत कुलकर्णी, पुणे**

**मा**नवाच्या आयुष्यातील सर्वांत मोठा संघर्ष म्हणजे मिळवण्याची लालसा. आपण सतत काही ना काही मिळवण्यासाठी धडपडतो-कधी ते भौतिक संपत्ती असते, कधी सांसारिक सुख, कधी मानसन्मान, तर कधी आध्यात्मिक उन्नती. हे सर्व साध्य करण्यासाठी आपण प्रयत्न, युक्ती, याचना किंवा स्पर्धा करतो. परंतु नाथ संप्रदायातील एक सूक्त वचन वाचनात आले. ते खालील प्रमाणे-

**अयाचितममृतं याचितं पानीयं**
**स्पर्द्धाभरेण रक्तं जानीयात्।**
**नाथः कथयतीदं ज्ञानमनुपम दृशा पश्यन्**
**कूपे पातो न कर्त्तव्य इति।।**

हे आपल्या मानवी वागणुकीला आरसा दाखवणारे आहे. हे वचन एकाच वेळी अतिशय साधे वाटते, पण त्यामागे खोल आध्यात्मिक आणि मनोवैज्ञानिक अर्थ दडला आहे. या वचनाचा सखोल अन्वयार्थ घेतल्यास आपल्याला संपूर्ण जीवनाचं एक अतुलनीय तत्त्वज्ञान प्राप्त होतं.

'अयाचित' म्हणजे न मागता मिळालेलं. नाथ संप्रदायात हाच सर्वश्रेष्ठ प्राप्य मानला जातो. येथे 'अमृत' हा शब्द वापरून या गोष्टीच्या महत्त्वावर प्रकाश टाकला गेला आहे. जीवनामध्ये जे काही निसर्गतः आणि सहजपणे आपल्या वाट्याला येतं- प्रेम, शांतता, आनंद, किंवा आध्यात्मिक जागरूकता ते अमृतासारखं असतं. ते मनाला समाधान देणारं असतं, अहंकारशून्य असतं आणि स्वतःसह इतरांनाही समृद्ध करणारं असतं. दैव, नशीब किंवा ईश्वर ह्यांच्या कृपेने जे काही मिळतं, त्यामध्ये एक प्रकारचं माधुर्य असतं. जणू ते संपूर्ण सृष्टीच्या सुसंवादातून आपल्या आयुष्यात उतरलेलं असतं. अशा गोष्टी हे आपल्या आत्म्याच्या गरजांशी सुसंगत असतात. म्हणून नाथ सांगतात की अशा गोष्टींचं जीवनात मोल अनमोल आहे.

'याचितं' हे विशेषत्वाने 'मागून मिळवलेलं' दर्शवतं. ते 'पानीयं' म्हणजेच पाण्यासारखं असतं गरजेचं, पण क्षणिक. पाणी जसं तहान भागवतं, पण पुन्हा पुन्हा लागणारी गरज आहे, तसंच मागून मिळवलेलं सुखदेखील असतं. या वचनातून नाथ आपल्याला सांगत आहेत की जे आपण विनंती, याचना, अपेक्षा किंवा प्रसंगी मागून मिळवतो, ते फार काळ टिकत नाही. त्यात समाधान कमी आणि असुरक्षितता अधिक असते. मागणी ही एका अपूर्णतेतून येते, आणि ती गरज भागवली गेली तरी ती पुन्हा जागृत होते. ही

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

चक्रव्यूहासारखी स्थिती आहे. याचनेने मिळालेल्या वस्तूंमध्ये दुसऱ्याची कृपा, दया किंवा संमती असते. त्यामुळे त्या गोष्टीमागे आपली स्वतंत्रता राहत नाही. संयम, स्वतःवरचा विश्वास आणि स्वाभाविकता हरवते.

आजच्या युगात हा भाग सर्वाधिक संबंधित आहे. चढाओढ, मत्सर, स्पर्धा या गोष्टी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. येथे स्पर्धा म्हणजे खेळ नव्हे तर ईर्षा होय. नाथ संप्रदाय त्या काळातच या मानसिकतेची भीतर चिकित्सा करत होते. जो पदार्थ अथवा स्थान आपण स्पर्धेने मिळवतो, त्यामध्ये सामाजिक हिंसा, वैमनस्य, अहंकार आणि क्लेश असतो. 'रक्तं' हा शब्द उपयोग करून या आघातांवर बोट ठेवलेलं आहे. या रक्तात इतराचा अपमान, नुकसान किंवा अधःपतन मिसळलेले असते. स्पर्धा ही केवळ बाह्य होत नाही, ती मनाच्या अंतर्गतही होती. आपण स्वतःशी स्पर्धा करतो, आपण दुसऱ्याच्या यशापेक्षा स्वतःला कमी समजतो. त्यामुळे आत्मसंतोष हरवतो. नाथ सांगतात, की अशा स्थितीत मिळालेलं काहीही 'शुद्ध' नाही, आपण आपलेच यश आपल्याच इर्षायुक्त रक्ताने माखलेलं असतं. ते समाधान देत नाही.

नाथ संप्रदाय हे अध्यात्म, योगमार्ग आणि वैराग्य यांचं प्रतीक आहे. त्यांच्या भाष्यांमध्ये 'अनुभव' हे खूप महत्त्वाचं स्थान घेतं. 'ज्ञानमनुपम' अशा स्वरूपाचं ज्ञान फार दुर्लभ आणि उदाहरणाच्या पलीकडचं आहे. तो अनुभव घेतल्याशिवाय याची खरी जाणीव होत नाही. हे ज्ञान पुस्तकांमध्ये नव्हे तर आत्मप्रत्ययामध्ये मिळतं. त्यामुळे ते अद्वितीय आहे. व्यक्तीकेंद्रित, पण सर्वसमावेशक देखील आहे. या वचनातून नाथ हे आपल्याला त्याग, समर्पण, आणि आत्मस्थिती यासंबंधी जीवनाचं अत्यंत मूलभूत तत्त्वज्ञान शिकवत आहेत. मानवाला बुद्धी आहे, निर्णयशक्ती आहे, आणि आध्यात्मिक जागरूकता आहे. तरीही तो स्वार्थ, लोभ, द्वेष आणि मोहामध्ये सापडतो. नाथ इथे चेतावणी देतात की जसं आपण डोळ्यांनी विहीर समोर दिसत असूनही तिच्यात उडी मारू नये, तसंच भौतिक सुखांच्या लालसेने आंधळे होऊन भौतिक गोष्टींच्या मागेमागे जाऊन वावटळीत अडकू नये. डोळसपणे जगणं हेच आध्यात्मिकतेचं खरे प्रकटीकरण आहे. जेव्हा मन 'अहंकार' आणि 'अविचार' या विहिरीत पडतं, तेव्हा उगम नसलेल्या दुःखाचा आरंभ होतो. म्हणून, नाथ सांगतात की समोर धोका दिसत असताना आपण विचारपूर्वक वागायला हवं. हेच अप्रतिम संयमाचं शिक्षण आहे.

अपेक्षा ही अनेकदा दुःखाला कारणीभूत ठरते. आपण काहीतरी विचारात घेतो, स्वप्न पाहतो आणि ते पूर्ण न झाल्यास दुःखभोग करतो. हे दुःख केवळ साधन न मिळण्याचं नसतं, तर आत्मसंतोषाच्या अभावाचं असतं. आधुनिक मानसशास्त्र देखील या गोष्टीला पुष्टी देत. अपेक्षा ही सर्व दुःखांचे मूळ आहे. नाथ संप्रदायही हेच सांगतो 'त्यागे शान्तिरनन्तरम्'। परंपरेनुसार नाथयोगात 'सहजयोग' किंवा 'सहज अवस्था' ही सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे. जे जे स्वाभाविक आहे, स्वतःकडे ओढून घेतले गेले नाही, तेच खरे स्थायी सुख. यासाठी योगी 'आसक्तीतून विरक्तीकडे' प्रवास करतात. अयाचित आणि स्वाभाविक कृतीमधून मिळालेलं सुख, हे जीवनसत्त्व आणि चैतन्य देतं. यात कामना नसते, केवळ करुणा असते. यातील शाश्वतता हीच आत्मज्ञानाची पहिली पायरी ठरते. इथे विहीर ही फक्त भौतिक विहीर नसून ती 'आकर्षणाची', 'मोहाची', 'कामनांची' विहीर आहे. आपण स्वतःच्या मोहाने झपाटून जातो आणि शुद्ध विचारशक्ती हरवून बसतो. त्यामुळे विहिरीत पडतो. म्हणजे दुःख, असमाधान आणि आंतरिक शांती ओढवून घेतो. नाथ सतत चेतावणी देतात की अशा अवस्थांमध्ये स्वतःचं गांभीर्य ओळखवा, आणि खऱ्या

आत्मस्वरूपाकडे वळा.

नाथ परंपरेत अध्यात्म हे केवळ ईश्वरप्राप्तीसाठी नसतं, तर 'स्व' प्राप्तीसाठी असतं. 'अहं ब्रह्मास्मि', 'सोऽहम्' ही वाक्य विशुद्ध आत्मज्ञानाची दिशा दाखवतात. वृत्ती, स्पर्धा, याचना, मोह वगैरे षडरिपु या सर्व पातळींच्या पलीकडे जाऊन जेव्हा आपण आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावतो, तेव्हा खरी 'अमृततुल्य प्राप्ती' होते.

नाथांचे हे वचन केवळ एक आध्यात्मिक उपदेश न राहता, जीवनमूल्यांसाठी एक आदर्श ठरतो. संयम, योग, त्याग, साधना, आणि अध्यात्म हा त्यांचा केवळ वैयक्तिक मार्ग नव्हता, तर समाजासाठी एक व्यवहार्य तत्त्वज्ञानदेखील होते. आजच्या स्पर्धात्मक जीवनात, जेथे प्रत्येक माणूस 'मिळवण्याच्या' मोहाने झपाटलेला आहे, तेथे हे वचन 'शांततेकडे जाणारा एक हितमंत्र' ठरतो. शेवटी, अयाचितममृतं, याचितं पानीयं, स्पर्धाभरेण रक्तं जानीयात्... हे वचन आपल्याला शिकवतो की जर तुमचं जीवन तृप्त, समाधानी आणि शाश्वत हवं असेल, तर आपण स्वाभाविकतेचा स्वीकार करावा, कमीतकामी अपेक्षा ठेवावेत, इर्षात्मक स्पर्धेपासून सुटका करून घ्यावी, आत्मबोध प्राप्तीच्या दिशेने पावलं टाकावेत, आणि या सर्व गोष्टीचा अनुभव डोळस'पणे आणि जागरूक राहून घ्यावेत. याच मार्गाने जीवनाची उंच शिखर गाठावे. हीच शिकवण देताना जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात -

**ओळखावे वस्तू सांडावे कल्पना।**
**नको आडराना जाऊ झणीं।।**

**- बंडोपंत दि. कुलकर्णी,**
सोलापूर.
जिल्हा न्यायाधीश, पुणे.

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## 'ज्ञानेश्वरी'तील आत्मादर्शक सौंदर्यस्थळे - भाग : ६



### आत्मविशुद्धतेची तर्कशुद्ध मांडणी...

आत्म्याची विशुद्धता आणि विकास कशावर अवलंबून असतो असा प्रश्न जेंव्हा उपस्थित होतो तेंव्हा अनेक पैलू अन् निकष पुढे येतात. विशुद्धता या शब्दातच पावनपन सामावलेले आहे. माउली अहंकार टाळायला सांगतात. अहंकाराचा त्याग करायला सांगतात. अस्तित्व खरे त्यावरच तर अवलंबून असते. कोश कीटकाचे रुपक माउली ज्ञानदेव वापरतात. आपणच तर आपले वैर ओढवून घेतो, विकार गुरफटवून घेतो. आत्मबुद्धीची साद कधी समजून उमजून घेणार जीव!

-डॉ. सुनील शिंदे

**मा**उली 'ज्ञानेश्वरी'च्या सहाव्या अध्यायात शब्दाचें व्यापकपण कथन करताना असाधारण स्वरूपदेखील सूचित करतात. भावज्ञेचे गुणत्व मान्य होते, बोलाची ताटे अन् कैवल्य रसाची गोडी विशद करतात. निष्काम भाव विचारात घ्यावा लागतो. आत्मप्रभेचे नित्य नवे रूप येते प्रत्ययास. आत्मभान, आत्मभाव आणि आत्म्याचे आशयत्व ओघानेच ध्यानी घ्यावे लागते. मनाचे निजांग ते ही स्वीकृत होतेच होते. ब्रह्मचैतन्य अर्थात् ब्रह्म ज्ञान नसते दूर आणि अलग. यासंदर्भातील माउलींची विश्लेषणपर भूमिका पुढील ओव्यांतून प्रत्ययास येते -

**तैसें शब्दाचें व्यापकपण। देखिजे असाधारण।**
**पाहातयां भावज्ञां फावती गुण। चिंतामणीचे।।२१।।**
**हें असोतु या बोलाचीं ताटें भलीं। वरी कैवल्यरसें वोगरिलीं।**
**ही प्रतिपत्ति मियां केली। निष्कामासी।।२२।।**
**आता आत्मप्रभा नीच नवी। तेचि करुनी ठाणदिवी।**
**जो इंद्रियांतें चोरुनि जेवी। तयासीचि फावे।।२३।।**
**येथ श्रवणाचेनि पांगे। वीण श्रोतयां होआवें लागे।**
**हे मनाचेनि निजांगें। भोगिजे गा।।२४।।**
**आहाच बोलाचि वालीफ फेडिजे। आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे।**
**मग सुखेंसी सुखाडिजे। सुखाचिमाजीं।।२५।।**

(ज्ञानेश्वरी : अन्. ६)

सुखरूप सुखानुभव सुखावह होतो, सुखवूनी जातो तो असा आत्मचिंतनाने! आत्मिक बळाचे चिंतन तसेच विवेचन माउली सुरेख शब्दांत कथन करतात.

आत्म्याची विशुद्धता आणि विकास कशावर अवलंबून असतो असा प्रश्न जेंव्हा उपस्थित होतो तेंव्हा अनेक पैलू अन् निकष पुढे येतात. विशुद्धता या शब्दातच पावनपन सामावलेले आहे. माउली अहंकार टाळायला सांगतात. अहंकाराचा त्याग करायला सांगतात. अस्तित्व खरे त्यावरच तर अवलंबून असते.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

कोश कीटकाचे रुपक माउली ज्ञानदेव वापरतात. आपणच तर आपले वैर ओढवून घेतो, विकार गुरफटवून घेतो. आत्मबुद्धीची साद कधी समजून उमजून घेणार जीव!

आपणच आपले डोळे झाकून घेऊन निदैवी होतो. आंधळेपणाचे डोहाळे स्वीकारतो. भ्रमलेपण ते तर मनाचे, भरकटतच राहते, मनशंका सैरभैर करते. अस्तित्वाचे सत्य जे आहे ते तर नाही टळत. स्वप्न अन् सत्य यांतला भेद तर यावा ध्यानी.

**हा विचारुनि अहंकारु सांडिजे। मग असतीच वस्तु होइजे।**
**तरी आपली स्वस्ति सहजें। आपण केली।।७१।।**
**एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी। तो आपणया आपण वैरी।**
**जो आत्मबुध्दी शरीरीं। चारुस्थळी।।७२।।**
**कैसे प्राप्तीचिये वेळे। निदैवा अंधळेपणाचे डोहळे।**
**कीं असते आपुले डोळे। आपण झांकी ।।७३।।**
**कां कवणु एकु भ्रमलेपणे। मी तो नव्हे गा चोरलों म्हणे।**
**ऐसा नाथिला छंद अंतःकरणें। घेऊनि ठाके।।७४।।**
**एऱ्हवीं होय तें तोचि आहे। परि काई कीजे बुध्दी तैशी नोहे।**
**देखा स्वप्नींचेनि घायें। की मरे साचें।।७५।।**
**जैसी ते शुकाचेनि आंगभारें। नळिका भोविन्नली एरी मोहरें।**
**तेणें उडावें परी न पुरे। मनशंका।।७६।।**
**(ज्ञानेश्वरी, अ. ६, ओ. ७१ ते ७६)**

आत्म विशुद्धतेची माउलींची मांडणी तर्कशुद्ध आहे. यासाठी विकारांवरील मात मोलाची. अहंकाराचे मूळ जावे. प्रश्न सायासे सुटतील. प्रवृत्तीच्या पल्याड जाणीव उमगावी. अनुभवाची पावले असतात समृद्ध. आत्मभान आणि आत्मबोध तर आकळावा.

**तेथ प्रवृत्तितरुच्या बुडीं। दिसती निवृत्तिफळाचिया कोडी।**
**जिये मार्गीचा कापडी। महेशु आझुनि।।१५३।।**
**पैं योगवृंदे वहिलीं। आडवीं आकाशीं निघालीं।**
**कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं। धोरणु पडिला।।१५४।।**
**तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतली एकसरें।**
**कीं येर सकळ मार्ग निदसुरे। सांडुनियां।।१५५।।**
**पाठीं महर्षी येणें आले। साधकांचे सिद्ध जाहाले।**
**आत्मविद थोरावले। येणेंचि पंथें।।१५६।।**
**हा मार्गु जैं देखिजे। तैं तहान भूक विसरिजे।**
**रात्रिदिवसु नेणिजे। वाटे इये।।१५७।।**
**चालतां पाऊल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणी उघडे।**
**आव्हांटलिया तरी जोडे। स्वर्गसुख।।१५८।।**
**(ज्ञानेश्वरी : अ. ६, ओ. १५३ ते १५८)**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

आयुष्यरुपी तेजोनिधीचे रुपक वापरताना माउली आत्मसिद्धीवर वेगळे भाष्य करताना दिसतात. अकाली आभाळ आल्यावरी जसे ते टिकतही नाही आणि बरसतही नाही. श्रद्धेची स्थिती तर याहूनही विलक्षण प्रत्ययासी येते. मोक्ष सौख्याची अपेक्षा एका बाजूला आणि मोक्षाशिवाय गती दुसऱ्या बाजूला अशी ती अवस्था! यासंदर्भातील माऊलींचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे -

**तंव आत्मसिद्धी न ठकेचि। आणि मागुतें न येववेचि।**
**ऐसा अस्तु गेला माझारींचि। आयुष्यभानु।।४३३।।**
**जैसें अकाळीं आभाळ। अळुमाळु सपातळ।**
**विपायें आलें केवळ। वसे ना वर्से।।४३४।।**
**तैसी दोन्ही दुरावलीं। जे प्राप्ती तंव अलग ठेली।**
**आणि अप्राप्तीही सांडवली। श्रद्धा तया।।४३५।।**
**ऐसा वोलांतरला काजीं। जो श्रद्धेचांचि समाजीं।**
**बुडाला तया हो जी। कवण गति।।४३६।।**
**श्रीभगवानुवाच-पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते।**
**न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।।४०।।**
**तंव कृष्ण म्हणती पार्था। जया मोक्षसुखीं आस्था।**
**तया मोक्षावांचुनि अन्यथा। गती आहे गा।।४३७।।**
**परि एतुलेंचि एक घडे। जें माझारी विसवावें पडे।**
**तेंही परि ऐसेनि सुरवाडें। जो देवां नाहीं।।४३८।।**
**एऱ्हवी अभ्यासाचा उचलतां। पाउलीं जरी चालतां।**
**तरी दिवसाआधीं ठाकिता। सोऽहंसिद्धीतें।।४३९।।**
**(ज्ञानेश्वरी : अ. ६, ओ. ४३३ ते ४३९)**

आत्मविशुद्धतेची माउलींची अशी ही तर्कशुद्ध मांडणी आणि स्पष्टीकरण. आत्मा मालिक.

**-डॉ. सुनील शिंदे,**
'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी',
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/९०७५९९४३३२)

***

# गुरुपौर्णिमा महोत्सव-२०२५

**आ**त्मा मालिक ध्यानपीठ कोकमठाण, आत्मा मालिक ध्यानयोग मिशनद्वारा ८ ते १० जुलैदरम्यान प. पू. सद्‌गुरू माऊलींसह आश्रमातील सर्व संतांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा झाला. गुरुपौर्णिमा महोत्सवासाठी आश्रमात मागील महिनाभरापासून तयारी सुरू होती. ७ जुलै रोजी प्रसादाच्या भट्टीचे पूजन, यज्ञ, पूजाविधीसह बुंदी प्रसाद तयार करण्यात आला. यासाठी वेगवेगळ्या सत्संग मंडळाने प्रसाद तयार करण्यासाठी आपली सेवा दिली. महोत्सवादरम्यान देशभरातील सत्संग मंडळाच्या कार्यकर्त्यांनी, महिला भगिनींनी विविध सेवेत योगदान देऊन संपूर्ण उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.

सर्व आश्रम परिसरात आवश्यक तेथे मंडप टाकून विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ८ जुलै रोजी प्रातःकाळी काकड आरती, आत्मस्वरूप पाद्यपूजा, होम-हवन होऊन सकाळी ८ ते १० दरम्यान भजन व मौनध्यान झाले.

या उत्सवासाठी आलेल्या सत्संग मंडळातील भजनी मंडळीने आश्रमातील भजनी कलाकारांसोबत संतांची निवडक भजने सादर केली. दुपारची आरती झाली. सायंकाळी ४ ते ६ दरम्यान सविता नायगांवकर या भजनी मंडळाने संत ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ टाळ मृदंगाच्या गजरात सादर केला. उपस्थित सर्व भाविक भक्त हरिपाठात तल्लीन झाले.

यादरम्यान प. पू. सद्‌गुरु माऊली कुटीमध्ये विराजमान होते. रांगेतून सर्व भक्त गुरुदेवांचे दर्शन घेत होते. गुरुदेवांच्या प्रफुल्लीत मुखकमलाचे दर्शन घेऊन भाविकांमध्येही चैतन्य संचारत होते. हे दृश्य अत्यंत मनोहारी, पवित्र-पावन असे होते. भावभक्तीने श्रद्धेने हात जोडून अंतःकरणी गुरुस्मरण करीत भक्त दर्शन घेत पुढे सरकत होते.

श्रीगुरूंच्या सानिध्यात आल्याक्षणी अंत:करणात सात्विक अष्टभाव उमटतात. मनातील सर्व श्रम, दुःखे निवारण झाल्याची आत्मानुभूती येते. भक्ताला सुख, समाधान व आत्मानंदाची प्राप्ती होते. श्रीगुरु हे परब्रह्म स्वरूप आहेत.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।**

तेच ईश्वर स्वरूप आहेत. श्री गुरुदर्शन हेच आत्मदर्शन होय. श्री गुरु दर्शनाने भक्तांचे त्रिविध ताप, पाप, दैन्य निवारण होते व याची आत्मप्रचिती भक्तांना येते.

संत परमानंद महाराज, निजानंद महाराज यांनी महोत्सवासाठी आलेल्या सर्व भाविकांचे हार्दिक स्वागत केले.

सायंकाळच्या सत्रात कोपरगाव सत्संग मंडळाने आश्रमाच्या कलाकारांसमवेत भजनसेवा सादर केली. सर्व संतांच्या सहवासात हा सत्संग महादेवी सत्संग हॉलमध्ये झाला.

**हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा।**
**गुण गाईन आवडी, हेचि माझी सर्वगोडी।**
**न लगे मुक्ती धन संपदा, संत संग देई सदा।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी।**

सायंकाळच्या सत्रांत हिमाचल प्रदेशचे उपमुख्यमंत्री मुकेश अग्निहोत्री सहपरिवार व सहकाऱ्यांसोबत सद्‌गुरूंच्या दर्शनासाठी दाखल झाले. त्यांनी प. पू. सद्‌गुरूंचे दर्शन घेतले. संत परमानंद महाराज, संत निजानंद महाराज यांनी त्यांचे सद्‌गुरूंच्या वतीने स्वागत केले व आश्रमाच्या संतकार्याची माहिती दिली. त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सायंकाळी ८ वाजता आत्मस्वरूप आरती व ९ वाजता शेजारती होऊन महोत्सवाचा पहिला दिवस पार पडला.

दिनांक ९ जुलै रोजी चौदस पौर्णिमा, उत्सवाचा द्वितीय दिन. ब्रह्ममुहूर्तावर काकड आरती झाली. ठीक सकाळी ७ ते ८ वाजता संत परमानंद महाराज लिखित अवतारलीला आत्म स्वरूपाची (नित्य नियम साधना) ग्रंथाचे पारायण झाले. प. पू. सद्‌गुरूंच्या अवतार कार्याची रूपरेखा श्रीगुरुंचे प्रारंभिक चरित्र, आत्मस्वरूप प्राप्तीसाठी तळमळीने केलेली खडतर तपश्चर्या, विशेषतः येवला तपोभूमीतील आंतरिक तप साधना व झालेली ईश्वर प्राप्ती व आत्मबोध व तदनंतर प.पू. सद्‌गुरूंनी 'कोकमठाण' भूमीतून अखिल मानव कल्याणासाठी सुरू केलेले विश्वात्मक कार्य या ग्रंथातून भक्तांसाठी श्रीगुरु कार्याची ओळख होते. श्री गुरुप्रेरणा व आज्ञेने लिहिलेला हा ग्रंथ सद्‌गुरु चरणी समर्पित आहे.

ईश्वरप्राप्तीसाठी आत्मचिंतन करा व स्वस्वरूप आत्म्याला जाणून घ्या. आत्मज्ञानाच्या प्राप्तीने शाश्वत सुख, समाधान व शांती मिळते. सर्व जगाच्या आत्मिक कल्याणासाठी गुरुमाऊलीने सर्वांसाठी आत्मध्यानाचा सहज मार्ग सांगितला आहे. आत्मा सर्वांच्याच हृदयात निवास करतो. आत्मा हाच ईश्वर परमात्मा आहे. आत्म्यावर प्रेम करा. हा विश्वसंदेश प. पू. सद्‌गुरूंनी जगाच्या कल्याणासाठी दिला आहे.
दि. ९ जुलै रोजी पंढरपूर सत्संग मंडळाच्या संत राधामाई, ओझर सत्संग मंडळाचे चौधरी, कारदगा (कर्नाटक) येथील सत्संग मंडळ कांताभाऊ हुकिरे, नेर्ले (जि.सांगली) येथील सत्संग भजन मंडळ या सर्वांनी आपली भजनसेवा सद्‌गुरूचरणी सादर केल्या. त्यास आश्रमातील श्याम सुतार व कलाकारांनी साथ दिली. श्याम सुतार यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून भक्तीपूर्ण भजने सादर केली. त्याद्वारे श्रोते तृप्त झाले. या सर्व कार्यक्रमांचे थेट दृश्य स्क्रीनद्वारे सत्संग हॉलबाहेर बसलेल्या भाविकांनाही पाहता येत होते. त्याच समयी रांगेतून दर्शन घेणाऱ्या भाविकांसोबत सत्संगातील सर्वांनाच गुरुदेवांचे दर्शन होत होते.
दि. ९ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता आत्मस्वरूप प्रतिमा पालखीत ठेवून उत्साहात, वाद्यांच्या गजरात नाचत-गात, आत्मदेवाच्या जयघोषात आश्रमप्रदक्षिणा झाली. पालखी आत्मदेव मंदिरात आली. तेथे आरती झाली. सायंकाळी ५ वाजता नायगांवकर सत्संग मंडळाने भजनांसह हरिपाठ सादर केला.

विठ्ठलनामात दंग होऊन टाळ-मृदंगाच्या गजरात आनंदाने नाचत होते. बासरी, सनईची साथ होती. सविता नायगावकर व त्यांच्या बंधूंकडून ही हरिपाठाची सेवा आश्रमात मागील ३०-३५ वर्षांपासून गुरुपौर्णिमेच्या उत्सवात सद्‌गुरूचरणी सादर केली जाते. त्यानंतर कोलकाता येथून आलेल्या तुहीन भैय्या यांनी आपली भजनसेवा सादर केली. रात्री ८ ते ९ च्या दरम्यान आश्रमातील संत कबीरानंद महाराज यांनी प्रवचन केले. ते म्हणाले 'प. पू. सद्‌गुरू माऊलींनी सर्वांना आपले सत्य स्वरूप 'आत्मा' जाणून घेण्यास सांगितले आहे.

त्यासाठी जीवनात आत्मध्यानाचे महत्त्व सांगितले. मन-चित्त शांत करून निर्मल चित्तात सद्‌गुरू स्वस्वरूपाच्या ध्यानातून आत्मचिंतन केल्याने आत्मज्ञान मिळते व जीवाला सुख समाधान मिळते.
रात्री ९ वाजता इंदूर सत्संग मंडळातील गोपाळ शर्मा यांचे भजन व नाशिक सत्संग मंडळ, येवला सत्संग

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

मंडळांनी आपली भजनसेवा श्री गुरुचरणी सादर केली. रात्री ११ वाजता विद्याभवन सत्संग हॉलमध्ये सत्संग सुरू झाला. भजन गीते सादर झाली.

दि. १० जुलै रोजी मध्यरात्री १ वाजता मयूर देशमुख व सहकारी, नाशिक सत्संग मंडळाने 'भारुड सेवा' सादर केली. भारुडातून त्यांनी ध्यानाचे महत्त्व व त्यासाठी मनाची एकाग्रता याबाबत सांगितले. उत्तररात्री २ वाजता सविता नायगांवकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी भजनसेवा सादर केली. ब्रह्ममुहूर्तास प. पू. सद्‌गुरूंचे सत्संग हॉलमध्ये आगमन झाले. 'सबका मालिक आत्मा' जयघोष झाला. संत परमानंद महाराज यांचे प्रवचन झाले. ते म्हणाले, या गुरुपौर्णिमा महोत्सवाच्या पावन पर्वावर व पवित्र मुहूर्तावर, शांत निरव वातावरणात सद्‌गुरूंच्या सानिध्यांत आत्मध्यान होत आहे. परमात्म्याच्या असीम कृपादृष्टीचा वर्षाव सर्व भक्तांवर होत आहे.

त्यानंतर गुरुदेवांनी इच्छुक भाविकांना गुरुमंत्र दिला. हृदय कमलात प. पू. सद्‌गुरूंचे आत्मस्वरूप ध्यान केले. कर्पूरारती झाली व कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. १० जुलै रोजी प्रातःकाळी नित्य कार्यक्रम सत्संग ध्यान झाले. भाविकांनी रांगेतून सद्‌गुरू माऊलींचे दर्शन घेतले. या गुरुपौर्णिमा महोत्सवातील सर्व सेवा करण्यासाठी यावर्षी देशभरातील सत्संग मंडळांनी पुढाकार घेतला होता. दर्शन रांगेपासून ते भोजन तयार करणे, वाढणे, व्यासपीठ व्यवस्था आदी सेवा भाविकांनी न थकता, मोठ्या आनंदाने दिल्या. सर्व भाविक, अन्नदानासाठी सहाय्य केलेले दाते, कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतलेले प्रसादालयाचे प्रमुख बाळासाहेब गोरडे, गिरमे, भट यांसह सर्वांचे आभार मानण्यात आले. असा हा चार दिवसांचा उत्सव मोठ्या चैतन्यदायी वातावरणात साजरा झाला.

**– संकलन : बी. के. गायकवाड**
प्लॉट क्र.५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९
मो. नं. ९४०३०२६१६४

✻✻✻

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आत्मिक चेतना-न्याय और ईमानदारी

आत्मिक दृष्टि से न्याय और ईमानदारी, वह स्थिति है, जहाँ आत्मा विकृत नहीं होती, वह शुद्ध, निर्लिप्त और साक्षी भाव में रहती है तथा न्याय, वह प्रक्रिया है जो आत्मा की इस शुद्धता को समाज में व्यक्त करने का माध्यम है। चाणक्य ने कहा है: धर्मो रक्षति रक्षितः - जो धर्म की रक्षा करता है, धर्म उसकी रक्षा करता है।और धर्म, आत्मा का स्वाभाविक गुण है - न्याय और ईमानदारी उसी धर्म के अंग हैं। आत्मिक चेतना से परिपूर्ण उपरोक्त दो गुणों को इस लेख में हम तीन भागों में विभक्त होकर इस द्वैत की विवेचना करेंगे :- **- नरेश एवं नीता यादव**

**प्रस्तावना :**

मानव-समाज का परिमार्जन तभी संभव है, जब उसके हर अंग में दो मूल स्तम्भ-न्याय और ईमानदारी- दृढ़ता से खड़े हों। न्याय बिना ईमानदारी अधूरा, और ईमानदारी बिना न्याय असंगत है। न्याय, वह प्रक्रम है जो सत्य की खोज करता है; ईमानदारी वह मूल्य है जो व्यक्ति के अंतर्मन को सत्य के पथ पर अविचल बनाए रखता है। जब ये दोनों एक साथ मिलकर कार्य करते हैं, तो समाज में विश्वास, सुरक्षा और समृद्धि की भावना खिल उठती है।

साथ ही न्याय और ईमानदारी केवल सामाजिक या कानूनी मूल्य नहीं, बल्कि आत्मिक चेतना के दो स्वरूप हैं। जब कोई व्यक्ति अपने अंतरतम से जुड़कर कर्म करता है, तब उसकी नियत भी शुद्ध होती है, और निर्णय भी न्यायसंगत। भारतीय दर्शन में कहा गया है-

**आत्मानं विद्धि - अपने आप को जानो।**

जो व्यक्ति आत्मा को जान लेता है, वह बाह्य छल, दिखावा और अन्याय से ऊपर उठ जाता है। ईमानदारी आत्मा की मौन भाषा है, और न्याय उसका सामाजिक अनुवाद।

न्याय और ईमानदारी-आत्मा से जुड़ी आत्मिक दृष्टि।

आत्मिक दृष्टि से न्याय और ईमानदारी, वह स्थिति है, जहाँ आत्मा विकृत नहीं होती, वह शुद्ध, निर्लिप्त और साक्षी भाव में रहती है तथा न्याय, वह प्रक्रिया है जो आत्मा की इस शुद्धता को समाज में व्यक्त करने का माध्यम है। चाणक्य ने कहा है: धर्मो रक्षति रक्षितः - जो धर्म की रक्षा करता है, धर्म उसकी रक्षा करता है।और धर्म, आत्मा का स्वाभाविक गुण है - न्याय और ईमानदारी उसी धर्म के अंग हैं।

आत्मिक चेतना से परिपूर्ण उपरोक्त दो गुणों को इस लेख में हम तीन भागों में विभक्त होकर इस द्वैत की विवेचना करेंगे:

**१. न्याय और ईमानदारी की आत्मिक व्याख्या**- न्याय: वह विधि और आचरण, जिसके द्वारा सत्य का पालन हो, सभी पक्षों को समान सुनवाई मिले, और निर्णय वस्तुनिष्ठ तथ्यों पर आधारित हों। पद के दुरुपयोग से बचकर, सिर्फ भ्रष्ट न होने पर नहीं, अपितु न्यायपूर्ण दृष्टि से विरोधी पक्ष को भी क्षति न पहुँचने देंगे और ईमानदारी: मन का वह गुण जो किसी भी परिस्थिति में सत्यनिष्ठ, निष्काम और निश्चल रहता है। राजा

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

हरिश्चंद्र- सत्य और धर्म के प्रतीक। जब सत्य के मार्ग पर चलने के लिए उन्होंने अपना सब कुछ त्याग दिया, तब भी उन्होंने कभी न्याय का मार्ग नहीं छोड़ा, भले ही अपने ही पुत्र के मृत शरीर पर कर वसूलने की परीक्षा क्यों न आई हो। उनका आचरण इस बात को सिद्ध करता है कि ईमानदारी वह शक्ति है जो आत्मा की अखंडता से जन्म लेती है।

**२. कार्य में अनावश्यक देरी** - आत्मा के समयबोध की अनदेखी - न्याय की गरिमा अक्षुण्ण रखने के लिए समयबद्ध निर्णय लेना और सैद्धांतिक विवेचना कहती है पद-शक्ति अथवा अधिकार एक सामाजिक जिम्मेदारी भी है, जो तब तक मान्य है जब तक वह शोषण या अन्याय का कारण न बने। कबीर ने कहा है, देर से मिला न्याय, तो न मिला समान। आवश्यक है समय का महत्व: न्याय वह है जो समय पर मिले। अगर न्याय देर से मिला, तो कोई काम का भी नहीं रह सकता है। आत्मा का स्वाभाविक लय आध्यात्मिक दृष्टि से समय के साथ रहता है,  समय केवल घड़ी का चक्र नहीं है, बल्कि जीवन के कर्मों की गति है। यदि न्याय समय पर नहीं मिलता, तो आत्मा की पीड़ा बढ़ती है, और वह अंदर ही अंदर घायल होने लगती है।

गीता कहती है:

**कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः।**

- मैं काल हूँ, संहार करता हूँ।

न्याय में देरी - आत्मा के समयबोध की अनदेखी या समयबद्धता या जब विलंब आत्मा को दुखी करता है तब आत्मा के स्तर पर अन्याय को सहना भी पाप माना गया है। विलंब का अर्थ केवल फाइलों या कार्य कलापों की देरी नहीं, बल्कि पीड़ित आत्माओं की आर्तनाद को अनसुना करना है।

**प्रेरक कथा - संत एकनाथ और न्याय**

संत एकनाथ जी के पास एक व्यक्ति आया, जिसका खेत पर कब्ज़ा कर लिया गया था। संत ने अपनी संपूर्ण साधना को विराम देकर उसी दिन न्याय के लिए हस्तक्षेप किया। उन्होंने कहा: यदि मेरी आत्मा सत्य की उपेक्षा करे, तो यह भजन व्यर्थ है। चाणक्य सूत्र कहता है  न हि धर्मोऽधर्मात् कुर्यात् कालविलम्बनं अर्थात् धर्म को अधर्म बनाना हो तो उसमें देर कर दो - यही सबसे बड़ा अन्याय है। आत्मा का स्वभाव समता है, जो व्यक्ति आत्मा से जुड़ा होता है, उसकी दृष्टि सम होती है, गीता में भी कहा गया है जब आत्मा समभाव में स्थित होती है, तब न्याय पक्षपात से मुक्त होता है। एक दिन एक शिष्य चोरी करता पकड़ा गया। सारे विद्यार्थी चाहते थे कि गुरु उसे क्षमा कर दें क्योंकि वह गुरु का प्रिय था।गुरु बोले - जो प्रिय है, वही कठोर अनुशासन योग्य है, ताकि वह आत्मा से न कटे। उन्होंने निष्पक्षता से शिष्य को दंडित किया और बाद में व्यक्तिगत करुणा के साथ सुधार भी किया। यही न्याय है - निष्पक्षता के साथ करुणा। ।यदि न्याय की प्रक्रिया काल की मर्यादा नहीं समझे, तो वह स्वयं अधर्म बन जाती है।

**३. चेहरा देखकर पूर्वाग्रह न करना** - आत्मिक शांति की राह : समाज के बड़े-छोटे, अच्छे-बुरे सभी के साथ समान व्यवहार; कर्तव्यपथ पर कभी विचलित न होना। केवल 'मैं भ्रष्ट नहीं हूँ' कहना पर्याप्त नहीं;  न्याय की कसौटी पर खड़ा होना आवश्यक है, जहाँ हम अपनी आत्मा को संतुष्ट कर सकें। चाणक्य सूत्र कहता है, हिताहिमत निरीक्षणे कर्तव्यं तथा पश्यन् अर्थात् हित और अहित का विवेचन कर, अपने कर्तव्य का पालन करो। फिर, चाणक्य के और सूत्र कहता है सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयान्न ब्रूयाद् सत्यं अप्रियम् अर्थात् सत्य बोलो,

प्रिय बोलो, किंतु सत्य अप्रिय हो तो भी उसे बोलो। यह मूल मंत्र हमें याद दिलाता है: ईमानदारी होनी चाहिए, चाहे परिणाम जैसी भी हो। चेहरा देखकर निर्णय न करना - आत्मिक साहस यदि न्याय 'चेहरा' देखकर हो, तो वह आत्मा की नहीं, अहंकार की आवाज है। आत्मा कर्तव्य में निष्ठा रखती है, न कि संबंधों में। आत्मा के न्याय का दीपक भी यही है, न्याय और ईमानदारी तब तक अधूरे हैं, जब तक वे बाह्य नियमों पर आधारित हों। जब ये दोनों आत्मा से जुड़ते हैं, तो न्याय धर्म बन जाता है और ईमानदारी तपस्या, जब पद पर बैठा व्यक्ति आत्मा से जुड़े निर्णय करे, तो न्याय गहराई से किया गया धर्म-निर्णय होता है। जब समय की मर्यादा को आत्मिक स्तर पर समझा जाए, तो विलंब स्वयं अन्याय का रूप ले लेता है। और जब चेहरा देखकर निर्णय नहीं होता, तब आत्मा की समदर्शिता जाग्रत होती है।

**निष्कर्ष**

न्याय और ईमानदारी - ये दो आत्मिक स्तम्भ हैं, जिनके बिना कोई समाज, कोई संस्थान, कोई व्यक्ति ठहर नहीं पाता।

**अंतिम पंचवाक्य:**

**न्याय नाव तु गम्यते किंचित्, ईमानदारी शोभते चराचरम्;**
**समयो हि नियमनिर्धर्ता, पूर्वाग्रहविहीनता है सर्वश्रेष्ठ धर्मः।**

इस प्रकार, यदि हम व्यक्तिगत जीवन से लेकर शासन-प्रशासन, न्यायालय से लेकर ग्राम-समिति तक, हर स्तर पर न्याय एवं ईमानदारी को सर्वोच्च प्राथमिकता दें, तो न केवल हमारे निर्णय निष्पक्ष होंगे, अपितु समाज में स्थिरता, विश्वास और समृद्धि भी स्वतः प्रवाहित होगी। फिर संक्षिप्त काव्य के रूप में बताया

चेहरे की चाह नहीं आत्मा की है दृष्टि,
यही न्याय की सच्ची हो सद्-संविदृष्टि।
न झुके न डरे, न स्नेह में बहके,
सत्य की जो रक्षा करे, आत्मा वही महके।

**आत्मा मालिक**

**– नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***




प. पू. सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या सानिध्यात......

आत्मा मालिक ध्यान योग मिशन

आयोजित

# आत्मा मालिक केरळ व दक्षिण भारत यात्रा

## स्पेशल रेल्वेने प्रवास

यात्रा प्रारंभ
दि. २५ ऑक्टोबर २०२५

नोंदणी अंतीम दिनांक
दि. १४ ऑगस्ट २०२५

प्रवास दिवस
११ दिवस

**सुविधा : एक वेळ नाष्टा, दोन वेळ चहा, दोन वेळ जेवण, निवास व्यवस्था, स्थानिक पर्यटन**

## यात्रेतील प्रेक्षणिय स्थळे

- कोपरगांव रेल्वे स्टेशन, कोकमठाण आश्रम
- गोकर्ण महाबळेश्वर कर्नाटक
- गुरुवायूर त्रिसूर
- त्रिवेंद्रम, पद्मनाभस्वामी मंदिर
- कन्याकुमारी, स्वामी विवेकानंद स्मारक, गांधी मंडपम
- सुचिंद्रम्, श्री थनुमालयान स्वामी मंदिर, सनसेट पॉईट
- रामेश्वरम व रामनाथ स्वामी मंदिर, पंबन ब्रिज चे विहंगम दृश्य, स्थानिक खरेदी
- मदुराई मीनाक्षी मंदिर
- श्रीरंगम, श्रीरंगनाथ स्वामी मंदिर, तंजावर मंदिर
- चेंगलपट्टू, महावलीपुरम व कांचीपुरम मंदिर
- कोपरगांव रेल्वे स्टेशन



**A/C Holder Name -** Atma Malik Dhyanyog Mission
**Bank Name -** State Bank Of India
**Branch -** Kopargaon
**A/C No. -** 40060057617
**IFSC Code -** SBIN0000414

टीप - यात्रेकरूंनी बँकेत पैसे भरल्यानंतर त्याची माहिती शेजारील फोन नं. पाठवावी

यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी आपापल्या आत्मसंघटकाकडे किंवा खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करून नावनोंदणी करावी.

**निवेदक**

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण मु.पो. कोकमठाण,
शिर्डी–कोपरगांव रोड, ता. कोपरगांव, जि. अ. नगर
९३७२९५१०१३, ९५६१४८०४४८, ८७९३३८७११८, ८३८००३९४०५,
९८२२८४४३१९, ९३७२१६३७१२,७३०४०४६६००, ९८२२८४४३१९,

✻ प्रेषक ✻

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**
मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी–कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)–४२३६०१